# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३४७ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### लोकशाहीचा खेळ

नुकत्याच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आटोपल्या. या निवडणुकीत भयंकर प्रकार पहायला मिळाले. लोकशाहीची मूल्य जपणाऱ्या नेत्यांनीच लोकशाहीला पायदळी तुडविल्याचे दिसून आले. पैठणचे आमदार विलास भुमरे हे आपल्या मुलासह मतदानाला गेले. मुलाला घेऊन त्यांनी मतदान केले. मतदान कसे होते हे त्यांनी मुलाला प्रत्यक्षात दाखवून दिले. त्यानंतर मुलाला कडेवर घेऊन बोटाची शाई दाखवित मतदान केल्याचे छायाचित्रकारांना दाखविले. सोलापूरचे आमदार अर्जुनसिंह मोहिते यांनीही असाच प्रकार केला. मोहिते हे चक्क आपल्या लहान मुलाला घेऊन मतदानाला गेले. त्यांच्या मुलाने मतदानाची बटन दाबली. सोबतच मुलाच्या बोटाला शाई लावली. आमदार संतोष बांगर हे चक्क मोबाईल घेऊन मतदान केंद्रात गेले. या सर्व प्रकाराचा बोभाटा झाला तेव्हा कुठे या नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकायला लागली. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांसमोर थातूरमातूर वक्तव्य करून वेळ मारून नेली. भुमरे म्हणाले, आपण कुटुंबियांसोबत मतदानाला जातो ना. मग मुलगा आला, तर कुठे बिघडले. मुलाने हट्ट केल्यामुळे त्याला मतदान कसे होते हे दाखविण्यासाठी नेले होते असे उत्तर दिले. मग मुलाच्या बोटावर शाई कशी लावली यावर ते निरूत्तर झाले. बाबर यांनी तर मोबाईलमधून मतदान करतानाचे चित्रण केले. हे प्रकार लोकशाहीला घातक नाही का? मुलाने हट्ट केला म्हणून त्याला मतदान केंद्रावर नेले असे या नेत्यांचे म्हणणे आहे. उद्या मुलाने लग्न करून द्या असे म्हटले, तर बालवयातच त्याचे लग्न करून देणार का? काहीतरी उत्तर द्यायचे म्हणजे द्यायचे. या प्रकारामुळे लोकशाहीला बांधील असलेल्या नेत्यांची मग्रुरी दिसून आली. या प्रकारांचा चांगलाच बोभाटा झाला. आता खापर फुटणार ते मतदान केंद्र अधिकाऱ्यांच्या माथ्यावर. नेत्यानेच आग्रह धरला, तर सरकारी कर्मचारी देखील काय करणार. कारण त्यालाही तेथेच नोकरी करावी लागते. त्यालाही जीव आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना मनाई केली असती त्या अधिकाऱ्यांची गडचिरोलीला बदली हे निश्चित होते. त्यामुळे त्यांनी काय करावे. या नेत्यांनी लोकशाहीला अगदी पायदळी तुडविले. हा निवडणुकीचा खेळ नव्हता, तर लोकशाहीचा खेळ होता असेच म्हणावे लागेल.

### कारला धडकल्याने दुचाकीस्वार जखमी

**नागपूर, दि. ८:** रस्त्यावर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाला धडकल्याने नवीनकुमार बिसने (३५)रा. गणेशनगर, दाभा हे गंभीर जखमी झाले. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ च्या सुमारास ते त्यांच्या दुचाकीने कामावर जात होते. अमरावती मार्गावरील वळू संगोपन केंद्रासमोर कारचालकाने आपले वाहन धोकादायकरीत्या उभे केले होते. त्या कारला धडकल्याने नवीनकुमार गंभीर जखमी झाले.

# विदर्भाला मिळाले आंतरराष्ट्रीय एक्सपोजर : गडकरी

## तिसऱ्या 'एडवांटेज विदर्भ -खासदार औद्योगिक महोत्सवा'चा दिमाखात समारोप

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

तीन दिवसांत तब्बल बेचाळीस हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार, २३ देशांचे राजदूत तसेच आंतरराष्ट्रीय उद्योग प्रतिनिधींची उपस्थिती यामुळे यंदाच्या एडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवामुळे विदर्भाला मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय एक्सपोजर मिळाल्याचे समाधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. नागपूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या एडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या समारोपीय सत्रात ते उपस्थितांना संबोधित करत होते. यंदाच्या महोत्सवात २५ तांत्रिक सत्रे, २५० मार्गदर्शक, साडेपाच हजारांहून अधिक शिष्टमंडळ प्रतिनिधी, विविध देशांचे राजदूत




*समारोपीर्य कार्यक्रमात बोलताना केंद्रीयमंत्री नितीन गडकरी*

तसेच ५२ बिझनेस-टू-बिझने बैठका आयोजित करण्यात आल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. एडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या अंतर्गत वर्षभर उपक्रम राबविता यावेत, यासाठी आगामी मे महिन्यात असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे संकुल तयार होत असल्याची माहितीही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी असोसिएशनने आता सेक्टरनिहाय काम करण्याचा सल्ला देत विदर्भातील २५ विशिष्ट औद्योगिक सेक्टर ओळखून त्यावर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले. तसेच, आगामी काळात फ्लॅश चार्जिंग तंत्रज्ञानावर चालणाऱ्या १३५ नवीन बसेस प्रवासी सुविधांना अधिक आरामदायी बनवतील, असे सांगताना त्यांनी पुढील तीन वर्षांत नागपूर शहराला पाइपलाईन द्वारे गॅस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचाही उल्लेख केला. तत्पूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात एआयडी सारखी संस्था विदर्भाच्या उद्योग जगताचा चेहरा मोहरा बदलला असल्याचे गौरव उदगार केंद्रीय एमएसएमई राज्यमंत्री शोभा करंदलाजे त्यांनी काढले. एमएसएमई चे १०० स्टॉल प्रदर्शनात असल्याबद्दल त्यानी समाधान व्यक्त केले. देशातील ३३ कोटीच्या वर उद्योजकांनी एमएसएमई पोर्टल वर ऑनलाइन नोंदणी केली आहे असे सांगून भारताच्या निर्यातीत एमएसएमई चे योगदान ४५% आहे असेही त्यांनी सांगितले. लोकांना नवीन तंत्रज्ञान शिकविण्यासाठी आपले मंत्रालय कौशल्य विकासाला प्राधान्य देत येत आहे. २०२६ च्या बजेट मध्ये सोप्या सबसिडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. विपणन ही समस्या असून ब्रॅण्डिंग सुधारण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. एक्सपोर्ट दर्जा उत्पादने तयार करण्याचा सल्ला त्यांनी उत्पादकांना दिला.

### लेटर ऑफ इंटेंट, सामंजस्य करार व सत्कार

समारोपीय कार्यक्रमादरम्यान एड-टेक क्षेत्रात 'लर्न कोच' आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट अंतर्गत लर्निंग स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

सुनील फेरो अँड इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड विदर्भात ५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून, या माध्यमातून सुमारे १,५०० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे. तसेच आरोह हॉस्पिटॅलिटी आणि महिंद्रा सिग्नेचर यांच्यात फाईव्ह स्टार रिसॉर्ट उभारणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

* याशिवाय एमएमआरडीए सोबत १,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी व्हीआयपीएलचे प्रशांत उगेमुगे यांचा सत्कार करण्यात आला.
* ग्रेटा एनर्जी लिमिटेडचे अनुप गोयल यांना २,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.
* नागपूरच्या प्रथम नागरिक महापौर नीता ठाकरे व उपमहापौर लिला हातीबेड यांचा सत्कार केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांच्या हस्ते, तर नरेंद्र बोरकर यांचा सत्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

# बांगलादेशात सर्व हिंदूंनी एकत्र येणे गरजेचे : मोहन भागवत

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८**

बांगलादेशात सव्वा कोटी हिंदू आहेत. ते एकत्र आले, तर काहीही करू शकतात. त्यांनी एक होणे गरजेचे आहे. लढायच ठरविल्यास, मागे हटायच नाही. जगभरातील सर्व हिंदू त्यांना मदत करतील. त्यासाठी आपल्याला सजग रहायला हवे असे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.



मुंबई येथे आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्याख्यानमालेत ते बोलत होते. मोहन भागवत पुढे म्हणाले, भाषेच्या आधारावर समाजात भेदभाव नाही. काही लोक जाणीवपूर्वक असे भेदभाव निर्माण करीत आहेत. स्थानिक प्रश्नाला मोठ करू नये. मात्र, काही लोक अशा गोष्टींना खींपाणी घालतात. राजकारणी त्यांचे काम करतात. आपण भारताच्या एकतेसाठी एकत्र आले पाहिजे. भ्रष्टाचार व्यवस्थेत नाही, माणसाच्या मनात असतो. मासा पाण्यात असताना कधी पाणी पितो कळतच नाही. त्याप्रमाणे सरकारमध्ये कधी भ्रष्टाचार होतो हे कळत नाही. संघ स्वयंसेवक गरीब असला तरी भ्रष्टाचार करणार नाही असा विश्वास व्यक्त करीत स्वयंसेवकांना भ्रष्टाचाराविरोधात उभे राहण्याचे आवाहन केले.

**एआयमुळे रोजगारावर परिणाम होऊ नये**

सध्या नवनवीन तंत्रज्ञान येत आहेत. आता कृत्रिम बुद्धीमता येणार आहे. तंत्रज्ञानाला नाकारू नये. मात्र, एआय आणि नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग रोजगारावर होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. केवळ यंत्राद्वारे होणाऱ्या प्रचंड उत्पादनापेक्षा लोकांच्या सहभागातून होणाऱ्या उत्पादनावर भर द्यायला हवा. आपल्याकडी हातांना काय हवंय. रिकाम्या हातांना काम मिळाल नाही, तर गुन्हेगारी, नक्षलवाद वाढतो असा इशारा सुद्धा भागवत यांनी केंद्र सरकारला दिला.

**विदेशी नागरिकांची कसून तपासणी आवश्यक**

आपल्याला दहशतवादा विरोधात एकत्र काम करायचे आहे. त्यासाठी परदेशातून येणाऱ्या लोकांची कसून तपासणी करणे आवश्यक आहे. आपण येथील स्थानिक नागरिकांना, मग ते कोणत्याही धर्माचे असोत, त्यांना रोजगार देऊ. परंतु, बेकायदेशीरपणे आलेल्या विदेशी नागरिकांना काम देता कामा नये. सुरक्षेच्या बाबतीत सतर्कता किती महत्वाची आहे हे दिल्लीतील बॉम्बस्फोटाच्या उुहरणावरून समजते. तेथे एका जागरूक नागरिकाला मिळालेल्या चिठ्ठीमुळे पोलिसांना मोठा कट उधळून लावता आला आणि संभाव्य अनर्थ टळला असेही भागवत यांनी नमूद केले.

**शेती, समाज आणि राष्ट्रहित**

आजच्या काळात शेती प्रश्नावर गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जेव्हा ३५० गावे एकत्र येऊन काम करतात, तेव्हा मोठे बदल घडून येतात हे विसरता कामा नये. जैविक शेतीचा अवलंब केल्यास शेतकरी खऱ्या अर्थाने स्वावलंबी होतो आणि गुलामगिरीतून मुक्त होतो. दुर्दैवाने, आजचा सुशिक्षित वर्ग आपल्या ज्ञानाच्या अहंकारात गुरफटलेला आहे. तो शेतीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे. हे चित्र बदलले पाहिजे. केवळ शेती करून चालणार नाही, तर गावातच शेती प्रक्रिया केंद्र उभी राहिली पाहिजेत. शेतकऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी शेतकरी कुटुंबात मुली देण्याची मानसिकता समाजात निर्माण व्हायला हवी असेही ते म्हणाले.

**संविधानाने दिलेल्या आरक्षणाला संघाचे समर्थन**

भारतीय संविधानाने दिलेल्या आरक्षणाला संघाचे समर्थन आहे. संविधानाने ज्यांना आरक्षण दिले आहे, त्यांना गरज असे पर्यंत आरक्षण द्यायला हवे.

ज्यादिवशी गरज संपील आहे त्यावेळी त्यांनी सांगावे म्हणजे आरक्षणाचा लाभ गरजवंतांना देण्यात येईल. राजकारणी जातीवादी, समतावादी नाहीत, तर ते व्होटवादी आहेत. जातीवाद संपू शकतो, फक्त सद्धावना असली पाहिजे असा विश्वास देखील भागवत यांनी यावेळी व्यक्त केला.

### ऑटोतून गांजाची तस्करी करणारा जेरबंद

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

ऑटोतून गांजाची तस्करी करणाऱ्या एका तस्कराला गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक करून त्याच्या ताब्यातून ४ किलो १२९ ग्रॅम गांजा जप्त केला. आदिल करीम शेख (रा.बिलालनगर, वांजरा) असे या तस्कराचे नाव आहे. आदिल शेख हा ऑटो चालवितो. ऑटो चालविण्याच्या बहाण्याने तो गांजाची तस्करी सुद्धा करतो अशी माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्याच्यावर पाळत ठेवली. शनिवारी सायंकाळी ५ च्या सुमारास पोलिस पथक बिलालनगर येथील म्हाडा क्वॉर्टरजवळ सापळा लाऊन बसले होते. त्याचवेळी आदिल हा ऑटो घेऊन घरी आला. ऑटोतून पांढऱ्या रंगाचे पोते काढून घरात नेत असताना पोलिसांनी त्याला दबोचले. पोत्याची झडती घेतली असता त्यात गांजा मिळून आला.

पोलिसांनी गांजा, ऑटो आणि मोबाईल असा ३ लाख १३ हजार २२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी त्याचा रेकार्ड तपासला असता त्याच्यावर गांजा तस्करीचे ४, घरफोडीचे ३, दुखापत २ आणि चोरीचे ७ आणि इतर असे एकूण २४ गुन्हे दाखल असल्याचे समजले. पोलिसांनी आदिलची विचारपूस केली असता भीलगाव येथील अतिक रफीक खान याच्याजवळून हा माल आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी दोघांच्याही विरोधात यशोधरानगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून आदिल यास अटक केली. अतिकचा पोलिस शोध घेत आहेत.

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात अशी अजितदादांची इच्छा : शिंदे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८**

दोन्ही राष्ट्रवादी पक्षांनी एकत्र यावे अशी अजितदादा पवार यांची इच्छा होती. तसे त्यांनी आमच्यासमोर बोलून दाखविले होते असा गौप्यस्फोट सिने कलावंत सयाजी शिंदे यांनी केल्याने राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. या वक्तव्यामुळे प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना जोरदार धक्का बसला आहे.



अजित पवार यांच्या निधनामुळे राजकारणात नवनवीन घडामोडी घडत आहेत. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याचप्रमाणे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांही जोरात सुरू आहेत. त्यातच सयाजी शिंदे यांनी उडी घेतल्याने राजकारणात चर्चांना उधाण आले आहे.

सयाजी शिंदे पुढे म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावे अशी अजितदादांची इच्छा होती. त्यांचे हे अपूर्ण स्वप्न पूर्ण व्हावे अशी इच्छाही शिंदेनी बोलून दाखविली. राज्याची ताकद वाढविण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावे असेही ते म्हणाले. सर्व धर्म समभाव ठेवून गरीब-श्रीमंत न बघता खालून वर आल्यामुळे त्यांनी सर्व पुढे नेण्याचे ठरविले होते. अजितदादांचे अपूर्ण स्वप्न सुनेत्राताईंनी पूर्ण करावीत. महाराष्ट्राची ताकद वाढवायची असेल, तर दोन्ही पवार कुटुंबियांनी एकत्र आले पाहिजे असेही ते म्हणाले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत आमच्यासमोर चर्चा झाली होती असा दावाही शिंदे यांनी यावेळी केला. याविषयी ते पुढे म्हणाले, कौटुंबिक भावना बाजूला सारून त्यांनी याबाबत निर्णय घ्यावा.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत चर्चा झाली होती. परंतु, अचानक अजितदादांचे निधन झाले.

कुणीही या गोष्टीला वेगळा मार्ग न लावता त्याआधी दोन्ही पवार कुटुंबिय एकत्र आले, तर महाराष्ट्र पुढे जाईल असेही ते म्हणाले. सयाजी शिंदे यांनी नुकतीच सुनेत्रा पवार यांची भेट घेतली हे विशेष.

# शिंदेसेनेच्या नेत्याची उपमहापौर पदावरून नाराजी, आता नॉट रिचेबल

**वृत्तसंस्था**
**नाशिक, दि. ८**

नाशिक महापालिकेच्या उपमहापौर पदावरून राजकारणात नवे वळण आले आहे. ऐनवेळी दुसऱ्याची उपमहापौरपदी वर्णी लावल्याने महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी आपली नाराजी व्यक्त करीत राजीनामा देण्याचा इशारा दिल्यानंतर सध्या ते नॉट रिचेबल आहेत.



उपमहापौरपदासाठी आधीपासून प्रवीण तिदमे चर्चेत होते. त्यांनीही यासाठी तयारी केली होती. मात्र, ऐनवेळी पक्षाने विलास शिंदे यांना उमेदवारी दिल्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे तिदमे समर्थकांमधंये प्रचंड नाराजी पसरली. निवड प्रकियेदरम्यान सभागृहात तणावपूर्ण वातावरण होते हे सुद्धा पक्षाच्या लक्षात आले. विलास शिंदे उपमहापौरपदी निवडून आल्यानंतर तिदमे हे उशीरा सभागृहात पोहचले. यावरून त्यांना पक्षाने शिस्तभंगाची नोटीस दिली होती. त्यामुळे आधीच असलेला असंतोष अधिक तीव्र झाला आणि तिदमे आक्रमक झाले.

घडामोडी गंभीर होत असल्याचे लक्षात येताच वरिष्ठ नेते सक्रिय झाले. उपमहापौर विलास शिंदे आणि उपनेते अजय बोरस्ते यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. मात्र, या चर्चेत सर्व गटांचा समावेश नसल्याने अंतर्गत मतभेद कायम आहेत. तिदमे यांनी आपल्या पदाचाच नव्हे, तर नगरसेवक पदाचा राजीनामा देण्याचे संकेत दिल्याने राजकीय समीकरणे बदलू शकतात. सध्या ते नॉट रिचेबल असल्याची माहिती आहे.

### औद्योगिक विकासावर भर : देवेंद्र फडणवीस



**अहिल्यानगर, दि. ८**

मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या अभियानावर आपला भर असून अहिल्यानगर येथील प्रकल्प हा जागतिक दर्जाचा असेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फटणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अहिल्यानगर येथील सुपा एमआयडीसीमधील टुरल इंडियाच्या अत्याधुनिक प्लांटचे उदघाटन झाले त्याप्रसंगी ते बोलत होते. फडणवीस आपल्या भाषणात पुढे म्हणाले, हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव आहे. यावेळी फडणवीस यांनी उद्योजक भरत गिते यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कमी वेळात गिते यांनी हा जागतिक र्दाचा प्रकल्प उभा केला आहे. फडणवीस यांनी मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानावर भर दिला. परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या वस्तू आता भारतातच तयार करणे ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले. नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्र देशाच्या आर्थिक प्रगतीला गती देईल. भारताची अर्थव्यवस्था ११ व्या स्थानावरून चौथ्या स्थानावर आल्याचे आणि लवकरच तिसऱ्या स्थानावर पोहोचेल असे सांगत, ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्य सरकार उद्योजकांच्या पाठीशी असून, इज ऑफ डुईंग बिझनेस आणि कॉस्ट ऑफ डुईंग बिझनेस सुधारण्यावर भर देत आहे. उद्योगांना त्रास देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देखील त्यांनी दिले.

# तेलंगणात म. फुलेंच्या पुतळ्याची विटंबना

## आंबेडकर आणि भुजबळ यांचा संघावर आरोप

**वृत्तसंस्था**
**संगारेड्डी, दि. ८**

तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यात पोलिसांच्या उपस्थितीत काही समाजकंटकांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे देशभऱ्यात संतापाची लाट उसळली आहे.





अॅड. प्रकाश आंबेडकर आणि छगन भुजबळ आक्रमक हात या घटनेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात असल्याचे म्हटले आहे. संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर या गावात ही घटना घडली. काही वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी गावात महात्मा फुले यांचा पुतळा बसविला होता. मात्र, गावातीलच दुसऱ्या गटातील लोकांना हा पुतळा नको होता. त्यामुळे गावात दोन गट तयार होऊन तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. ही स्थिती लक्षात घेता प्रशासनाने गावात पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. पोलिस बंदोबस्त असतानाही रविवारी सकाळी काही समाजकंटकांनी महात्मा फुले यांचा पुतळा विद्रूप करण्याचा आणि तेथून हलविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांना वेळीच रोखल्याने पुढील अनर्थ टळला. या घटनेची माहिती गावात पसरताच एकच खळबळ उडाली. लोकांनी पुतळा परिसरात एकच गर्दी केली होती.

**प्रकाश आंबेडकरांचा संघावर हल्लाबोल**

या घटनेनंतर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी समाज माध्यमांवर पोस्ट करीत या घटनेमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात असल्याचा आरोप केला आहे. हा केवळ महात्मा फुले यांच्यावरील हल्ला नसून दलित, आदिवासी आणि ओबीसी समाजावर झालेलला हल्ला आहे.

संघाला महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा तिरस्कार वाटतो. मनुवाद आणि ब्राम्हणवादावर संघाचे प्रेम आहे. हा हल्ला वंचितांच्या आणि बहुजनांच्या समतेच्या चळवळीवरील आघात आहे असाही आरोप त्यांनी केली. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांच्या तेलंगणात अशा घटना वारंवार घडत असताना तुम्ही हात बांधून गप्पा का? असाही प्रश्न आंबेडकरांनी केला.

**सामाजिक समतेवर घाला**

समता परिषदेचे अध्यक्ष आणि मंत्री छगन भुजबळ यांनीही आक्रमक होत या घटनेचा निषेध केला.

महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली. तेलंगणात सामाजिक विचारांवर हल्ला सुरू असल्याचा आरोप करीत शहा यांनी तातडीने कारवाई करावी अशीही मागणी भुजबळ यांनी यावेळी केली.

# मुख्याध्यापकाचा विद्यार्थिनीवर अत्याचार

## खळबळजनक शिक्षणसंस्थेला काळीमा : आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**घाटंजी, दि. ८**

समाजाला दिशा देणारी आणि सुरक्षिततेचा विश्वास देणारी शाळाच जर विद्यार्थिनींसाठी असुरक्षित ठरत असेल, तर ती बाब अत्यंत भयावह आहे. घाटंजी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद शाळेत घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे शिक्षण क्षेत्र हादरून गेले आहे.



तालुक्यातील एका गावातील सातवीत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत शाळेतील मुख्याध्यापकाने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली असून, या प्रकारामुळे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी मुख्याध्यापक किशोर मालवीय याने पीडित विद्यार्थिनीसोबत गेल्या एक वर्षापासून सातत्याने अत्याचार केल्याची बाब तपासात पुढे आली आहे. तक्रारीनुसार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी आरोपीने पीडितेला मोबाईलवरून कॉल करून बोलाविले. रात्री सुमारे १० वाजता असल्याने पीडितेने सुरुवातीला नकार दिला. मात्र मुख्याध्यापक असल्याने निर्माण झालेल्या भीती व मानसिक दबावामुळे ती गावातील बसस्थानकावर गेली. तेथे आरोपी चारचाकी वाहनात थांबलेला होता. वासनेच्या आहारी जाऊन आरोपीने त्या वाहनातच पीडितेवर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

इतकेच नव्हे, तर सन २०२५ मध्येही यापूर्वी असाच प्रकार घडल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्या वेळी पीडित शाळेतील डिजिटल खोलीत असताना अत्याचार झाल्याचे नमूद असून, ज्या शाळेत विद्यार्थिनी सुरक्षित असायला हव्या, त्याच ठिकाणी असे प्रकार घडत असल्याने शाळेतील सुरक्षिततेबाबत गंभीर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

तक्रार दाखल होताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. काही वेळातच आरोपी किशोर मालवीय याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४(२) (चक्र), ६५(१), ३५१(३) सह पॉक्सो कायद्यातील कलम ४ व ६ अंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन राठोड व प्रवीण तालकोकुलवार करीत आहेत.

## चंद्रपूर जिल्हा कारागृहात सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीच्या स्थानिक निधीतून मंजूर करण्यात आलेल्या (Decentralised Prefabricated Packaged Jail Liquid Waste Management System) सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते करण्यात आले.चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे बंद्यांच्या दैनंदिन वापरातून निर्माण होणाऱ्या अंदाजे १ लक्ष लिटर सांडपाण्याची साठवणूक होत होती. दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी कारागृहात आयोजित अभिविक्षक मंडळाच्या बैठकीत कारागृहातील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प राबविण्याबाबत जिल्हाधिकारी महोदयांनी निर्देश दिले होते.सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे प्रतिदिन निर्माण होणारे सुमारे १ लक्ष लिटर सांडपाणी शुद्ध करण्यात येणार असून, शुद्ध पाण्याचा कारागृह परिसरातील झाडे व हरित क्षेत्राच्या सिंचनासाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे. यामुळे नवीन पाण्यावरील अवलंबित्व कमी होणार आहे. सांडपाणी थेट बाहेर सोडले जाणार नसल्याने भूजल प्रदूषणास प्रतिबंध, तसेच परिसरातील दुर्गंधी, डास व रोगराई कमी होण्यास मदत होणार असून, कारागृहातील बंदी व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती होणार आहे.सदर प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीद्वारे रुपये १.०५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येऊन मे. लाइफफर्स्ट कॉन्सेप्ट्स अँड टेक्नॉलॉजीज प्रा. लि., पुणे यांना काम मंजूर करण्यात आले. या STP प्रकल्पाची क्षमता १०० CMD (१ लक्ष लिटर प्रतिदिन) इतकी आहे.

# पळवापळवी व घोडेबाजार टाळण्यासाठी राजकीय पक्षांकडून खबरदारी

## एकत्रित असलेल्या नगरसेवकांचे महापौर निवडणुकीच्या दिवशी थेट मनपात आगमन होणार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असून निवडणुकीच्या दिवशी पक्षांचे सर्व एकत्रित असलेल्या नगरसेवकांचे थेट महापालिकेतच आगमन होणार आहे. पळवापळवी, फोडाफोडी तसेच घोडेबाजाराच्या शक्यता लक्षात घेता सत्तेसाठी इच्छुक असलेल्या प्रमुख राजकीय पक्षांनी विशेष खबरदारी घेतली आहे.




महापौर व उपमहापौर ची निवडणूक १० फेब्रुवारी रोजी होणार असून सकाळी ११ वाजता चंद्रपूर मनपात नवनिर्वाचित सदस्याची सभा पार पडणार आहे.महापौर पदासाठी एकूण १० तर उपमहापौर पदासाठी एकूण ६ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले.१० फेब्रुवारी रोजीच नामनिर्देशन मागे घेता येणार आहे.त्यानंतर एकूण नामनिर्देशनपत्राची छाननी होणार आहे.व रिंगणातील उमेदवारांची नावे समोर येणार आहे.त्यानंतर महापौर व उपमहापौर निवडणुकीची प्रक्रिया सुरु होणार आहे.मनपा निवडणुकीत काँग्रेसला २७, भाजपा २३, शिवसेना (उबाठा) ६, शेकाप ३, वंचित २, शिवसेना (शिंदे) १, बसपा १, अपक्ष २ असा कौल जनतेनी दिला.मनपात ६६ नगरसेवक असून, बहुमतासाठी ३४ चे संख्याबळ आवश्यक आहे.मात्र एकाही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने, संख्याबळ जुळविण्यासाठी काँग्रेस व भाजपाकडून शर्तीचे प्रयत्न सुरु आहे. किंगमेकर ठरलेल्या शिवसेना (उबाठा) च्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.महापौरपदासाठी बहुमताचे गणित अत्यंत नाजूक असल्याने प्रत्येक नगरसेवकाचे मत महत्त्वाचे ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर कोणताही अनपेक्षित राजकीय धक्का बसू नये, यासाठी नगरसेवकांना निवडणुकीच्या आधीच वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याऐवजी थेट मतदानाच्या दिवशी मनपात पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ऐनवेळी संपर्क तुटणे, दबावतंत्र किंवा फूस लावण्याचे प्रकार टाळता येणार असल्याचे पक्षनेत्यांचे म्हणणे आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, काही पक्षांनी नगरसेवकांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र समन्वयकांची नेमणूक केली असून, प्रत्येक नगरसेवकाच्या हालचालींवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. निवडणुकीच्या दिवशी ठराविक वेळेत सर्व नगरसेवकांना थेट महापालिका सभागृहात आणले जाणार असून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना एकत्रित ठेवण्याची रणनीती आखण्यात आली आहे.दरम्यान, मागील काही दिवसांपासून राजकीय गोटात पळवापळवी व घोडेबाजाराच्या चर्चांना उधाण आले होते. काही नगरसेवकांवर दबाव टाकण्याचे तसेच प्रलोभने देण्याचे प्रयत्न होत असल्याच्या चर्चा रंगत होत्या. या पार्श्वभूमीवरच पक्षांनी कठोर भूमिका घेत कोणतीही जोखीम न घेण्याचा निर्णय घेतला आहे.महापौर निवडणूक शांततेत व पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी महापालिका प्रशासन आणि पोलीस यंत्रणाही सतर्क असून सभागृह परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. राजकीय हालचालींना वेग आला असताना प्रत्यक्ष मतदनाच्या दिवशी कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अवैध देशी-विदेशी दारू वाहतूक व विक्रीवर मोठी कारवाई

## १५ लाख ९४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** पोलीस स्टेशन सावली हद्दीत अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची विक्री व वाहतूक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत सुमारे १५ लाख ९४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शुक्रवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार व्याहाड बुद्रुक येथील रहिवासी महेश गड्डम हा त्याच्या परिणीती ट्रान्सपोर्ट एक्वा चिल्ड वॉटर नावाच्या ऑफिस व गोडाऊनमधून लाल रंगाच्या हुंडाई क्रेटा कारद्वारे देशी व विदेशी दारूची अवैध वाहतूक करणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन सावली हद्दीत पंचांसमक्ष कार, ऑफिस व गोडाऊनची झडती घेण्यात आली.झडतीदरम्यान आरोपीकडून ३८०० नग देशी दारू (९० मिली) किंमत १,५२,००० रुपये, रॉयल स्टॅग विदेशी दारू (१८० मिली, मध्य प्रदेश निर्मित) ३८४ नग किंमत ९९,८४० रुपये, रॉयल स्टॅग विदेशी दारू (१८० मिली, महाराष्ट्र निर्मित) ९६ नग किंमत २४,००० रुपये, हावर्ड्स ५००० कंपनीचे ५०० मिलीचे १४४ कॅन किंमत १८,७२० रुपये, दुकानाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली २,९५,४१० रुपये रोख रक्कम, सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर किंमत ५,००० रुपये, तसेच लाल रंगाची हुंडाई क्रेटा कार (क्र. MH 40 AR २३६५) किंमत अंदाजे १० लाख रुपये असा एकूण १५,९४,९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी आरोपी महेश गड्डम याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन सावली येथे अप.क्र. २६/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३३६ (२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.अवैध दारूविक्री व वाहतुकीविरोधात पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे सावली तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

# घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोकड चोरी करणाऱ्या दोन महिला आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** घरातील उघड्या खोलीतून सोन्याचे दागिने व रोकड चोरी करणाऱ्या दोन महिला आरोपींना ब्रम्हपुरी पोलिसांनी अटक करून सुमारे २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली असून पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.
ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादी शीला ऋषी मानकर (वय ५०, रा. मुई, ता. ब्रम्हपुरी) यांनी तक्रार दिली होती. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास त्यांच्या घरातील उघड्या खोलीत ठेवलेल्या कुकरमधील अंदाजे १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोप, दोन नग सोन्याची कानातली जोडी तसेच रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती.
या तक्रारीवरून ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात अप.क्र. १५३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे व त्यांच्या पथकाने परिसरात शोधमोहीम राबवली.तपासादरम्यान पोलिसांना मुखबिरामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, बाहेरगावाहून सर्कस व खेळ दाखविण्याच्या निमित्ताने आलेल्या काही महिला घरोगरी तांदूळ व खाण्याच्या वस्तू मागत फिरत असून त्यांनीच सदर चोरी केली असण्याची शक्यता आहे. या माहितीच्या आधारे नागभीड-ब्रम्हपुरी रोडवरील खुल्या जागेवर डेरा टाकून बसलेल्या दोन महिलांना पोलिसांनी पंचांसमक्ष ताब्यात घेतले.ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे चंदा सिकंदर सय्यद (वय ४०, व्यवसाय - मदारी, रा. दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक), मदिना अल्ताफ शेख (वय ३०, व्यवसाय - खेळ दाखविणे, रा. दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक) अशी आहेत.पोलिसांनी आरोपी महिलांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून अंदाजे १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोप (किंमत १,५०,००० रुपये), अंदाजे ३.२५० ग्रॅम वजनाची दोन नग सोन्याची कानातली (किंमत ४५,००० रुपये), ४,००० रुपये रोख रक्कम, तसेच १,००० रुपये किमतीचा जर्मन कंपनीचा कुकर असा एकूण २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयातील पाणीटंचाईवर तोडगा

## आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यात आला आहे. लॉईड मेटल घुग्घुसच्या माध्यमातून विहीर बांधकाम आणि पंप बसविण्यासाठी ११ लाख ५२ हजार ३८८ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे रुग्णालयातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच दैनंदिन वापरासाठी पाण्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची असते. मात्र पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात पाण्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांना तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रुग्णालयातील दैनंदिन कामकाजावरही याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या.ही बाब लक्षात येताच आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने संबंधित विभागांकडे पाठपुरावा करत पाणी टंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून लॉईड मेटल घुग्घुसतर्फे आवश्यक निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून रुग्णालय परिसरात नव्याने विहीर बांधण्यात येणार आहे, त्यावर पंप बसवून पाणीपुरवठ्याची सक्षम व्यवस्था उभारली जाणार आहे.

### लॉयड्स मेटल द्वारे आयोजीत क्रिकेट स्पर्धेत महावितरण संघ उपविजेता

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** महावितरणच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या स्पर्धांमध्ये चंद्रपूर परिमंडळाच्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केलेले आहेत पण घुगुस येथील लॉयड्स मेटल लीग यांनी आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धांमध्ये महावितरण चंद्रपूर परिमंडळातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी मिळून एक क्रिकेट संघ निर्माण केला आहे. व या स्पर्धेमध्ये भाग घेऊन त्यात उपविजेते पद मिळण्याचे यश ११ जानेवारी २०२६ रोजी प्राप्त केले आहे. वर्ष २०२५-२६ साठी लॉयड्स कप औद्योगिक स्पर्धेत एकूण १४ संघाचा समावेश होता. बाद फेरीच्या ३ सामन्यात विजय मिळवून महावितरण चंद्रपूर संघाने अंतिम सामन्यात आपला प्रवेश निश्चित केला. या स्पर्धेत उपविजेता ठरलेल्या संघाला पारितोषिक वितरण एम.आय.डी.सी. चंद्रपूर चे अध्यक्ष रुंगटा व लॉयड्स मेटल घुगुसचे मुख्याधिकारी वाय.जी.एस.प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले.आज ३ फेब्रुवारी रोजी मुख्य अभियंता चंद्रपूर परिमंडळ हरिश गजबे यांनी उपविजेता संघाचा सत्कार केला. यावेळी सर्व कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# रोहनकर कुटुंबाला तातडीची १० लक्ष रुपयांची मदत

## आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशील वृत्तीची पुन्हा एकदा प्रचिती आली. मातृछत्र गमावलेल्या एका कुटुंबाला त्यांच्या तत्परतेमुळे तातडीने आर्थिक मदत मिळाली. या कृतीमुळे त्यांच्यातील एक आदर्श लोकप्रतिनिधी सर्वसामान्यांना पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.गोंडपिपरी येथील वास्तु कार्यक्रमावरून परत येत असताना बामणीजवळ (बल्लारपूर) झालेल्या दुर्दैवी ट्रक अपघातात चंद्रपूरच्या छोटा बाजार येथील रहिवासी श्रीमती नीलिमा देवराव रोहनकर यांचे निधन झाले. या दुःखद घटनेनंतर आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तात्काळ पुढाकार घेत रोहनकर कुटुंबाला आर्थिक आधार मिळवून दिला.प्रभाग क्रमांक ७ जटपुरा येथील नगरसेवक रवी वामनराव लोणकर यांनी या घटनेची माहिती आ. सुधीर मुनगंटीवार यांना दिली. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दखल घेत लॉयड्स मेटल्सचे सिनियर जनरल मॅनेजर यांना अमित जयसिंग यांना या घटनेसंदर्भात माहिती देत लॉयड्स मेटल्स कंपनीकडून तात्काळ आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले.चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात मृतक महिलेचे पती श्री. देवराव रोहनकर, मुलगी निरुपा व नातेवाईकांची भेट घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना धीर दिला. त्यांच्या पुढाकारातून लॉयड्स मेटल्सकडून तातडीने १० लाख रुपयांचा धनादेश मंजूर करून तो सुपूर्द करण्यात आला.हा आर्थिक आधार त्यांच्या दुःखाची भरपाई करू शकत नाही; मात्र या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या सोबत आहोत, ही भावना व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे, असे आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले. रोहनकर कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती लाभो आणि दिवंगत आत्म्यास सद्गती मिळो, हीच प्रार्थना आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतली पक्षांच्या दुनियेची माहिती, कॉन्सेप्ट एकेडमीच्या ५० विद्यार्थ्यांना घेतला सहभाग

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**चिमूर दि.८ :** शंकरपूर वन विभाग कार्यालय व तरुण पर्यावरणवादी मंडळ शंकरपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने पक्षी निरीक्षण व गणना हा कार्यक्रम डोंगरगाव तलाव येथे घेण्यात आलेला आहे या गणनेत शंकरपूर येथील कॉन्सेप्ट एकेडमी चे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला आहे
डोंगरगाव तलाव पक्षासाठी प्रसिद्ध आहे स्थानांतरित पक्षी सुद्धा या तलावावर येत आहे वन विभागाच्या उपक्रमांतर्गत येथे पक्ष निरीक्षण व गणना करण्यात आली या गणनेत राजहंस शेकाटी बगळा हळदी कुंकू वेडा राघू टिटवी करकोचा बुलबुल खंड्या पाणकोंमडी तुतारी शराटी आदी पक्ष्यांचा अधिवास त्यांचे राहणीमान त्यांचे महत्त्व पक्ष्यांचे घरटे नर मादी ओळख आणि निसर्गचक्रात पक्षांचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना तरुण पर्यावरणवादी मंडळाचे आमोद गौरकर विजय गजबे वीरेंद्र हिंगे यांनी माहिती दिली यावेळी कन्सेप्ट अकॅडमी चे इम्तियाज शेख झीनत शेख उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनरक्षक राहुल बुरले प्रास्ताविक वनपाल विश्वनाथ पोरते आभार कालिदास गायकवाड यांनी केलेले आहे त्या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रदीप ढोणे जग्गू लांजेवार सुनील लांजेवार भारत तांबरभोगे रितेश गजभे शुभम जीवतोडे आदींनी अथक परिश्रम घेतले



# कबड्डीमुळे ग्रामीण क्रीडा संस्कृतीला नवी दिशा : सौ.सोनाली भास्कर कावळे (बांगडे)

## इटोली येथे जय बजरंग क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित भव्य पुरुषांच्या ग्रामीण कबड्डी स्पर्धेचा जल्लोषात समारोप

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** कबड्डीसारख्या पारंपरिक खेळांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळत असून, अशा स्पर्धांमुळे ग्रामीण खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होते, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या सौ. सोनाली भास्कर कावळे (बांगडे) यांनी केले. त्या जय बजरंग क्रीडा मंडळ, इटोली यांच्या वतीने आयोजित भव्य पुरुषांच्या ग्रामीण कबड्डी स्पर्धेच्या समारोपप्रसंगी बोलत होत्या.
इटोली (ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर) येथील ग्रामपचायतच्या भव्य पटांगणावर आयोजित या स्पर्धेचा मोठ्या उत्साहात व जल्लोषात समारोप झाला. स्पर्धेदरम्यान संपूर्ण परिसरात क्रीडाप्रेमींची मोठी गर्दी उसळली होती.या स्पर्धेत (ब) गट, ५५ किलो वजनगटांतर्गत ग्रामीण भागातील नामांकित कबड्डी संघांनी सहभाग नोंदवला. सामन्यांदरम्यान खेळाडूंनी चपळता, ताकद, डावपेच आणि संघभावनेचे उत्कृष्ट प्रदर्शन करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अंतिम दिवशी झालेल्या अटीतटीच्या सामन्यांमुळे प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली होती.स्पर्धेच्या समारोपप्रसंगी विजेत्या, उपविजेत्या तसेच तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावणाऱ्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षिसे व चषक प्रदान करून गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला बल्लारपूर काँग्रेस कमिटीचे ग्रामीण तालुकाध्यक्ष गोविंद उपरे, सरपंच तुलसीदास पिपरे, युवक तालुका अध्यक्ष नरेश बुरांडे, किन्हीचे माजी सरपंच वासुदेव येरगुडे, सामाजिक कार्यकर्ते भास्कर कावळे, बल्लारपूर काँग्रेस कमिटीच्या तालुका उपाध्यक्ष सौ. नाजुका हनुमान आलाम, शेखर आलम, सूर्यकांत दयालवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक करत अशा स्पर्धांमुळे ग्रामीण खेळाडूंना प्रोत्साहन व प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.या यशस्वी स्पर्धेच्या आयोजनासाठी जय बजरंग क्रीडा मंडळ, इटोलीच्या आयोजक समितीने अध्यक्ष मोहन तायवार, उपाध्यक्ष शंकर दयालवार, अक्षय दुग्धळे, सचिव सचिन वैरागडे, सहसचिव गणपत सिडाम, कोषाध्यक्ष आशिष बारसागडे, सहकोषाध्यक्ष राकेश पिपरे यांच्यासह मंडळाचे सर्व सदस्य व स्वयंसेवकांनी स्पर्धेचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले.या कबड्डी स्पर्धेमुळे इटोली व परिसरात क्रीडा चैतन्य निर्माण झाले असून, भविष्यातही असे क्रीडाविषयक उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थ व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली आहे.



# प्रत्येक बुधवारला महिलांसाठी रजोनिवृत्ती क्लिनीक

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.८ :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून राज्यातील महिलांचे आरोग्य सुदृढ राखणे, विशेषतः रजोनिवृत्ती कालावधीत महिलांमध्ये होणाऱ्या शारीरिक, मानसिक व हार्मोनल बदलावर योग्य वेळी वैद्यकीय उपचार, तपासणी व समुपदेशन उपलब्ध करून देण्याकरीता १४ जानेवारी २०२६ मकर संक्रांतीचे औचित्य साधून राज्यभरात रजोनिवृत्ती (मेनोपाज) क्लिनिक सुरू करण्यात आले.सदर योजनेच्या प्रभावी सुसूत्र अंमलबजावणी करण्याकरीता खालील पद्धतीने निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय, ज्या ठिकाणी स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध आहे, अशा ठिकाणी यापद्धतीचे विशेष क्लिनिक सुरू करण्यात आले

दैनिक युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ जिल्हा

सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६



## कोंढा येथे सरपंच चषक कबड्डी स्पर्धा

•युवाराष्ट्र दर्शन बाभूळगाव

नवज्योती क्रीडा मंडळ व सरपंच ग्राम पंचायत कोंढा यांच्या संयुक्त विद्यमाने कोंढा येथे सरपंच चषक कबड्डीच्या खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ह्या स्पर्धांचे उद्घाटन 9 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5.30 वा. गावातील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे होत असून कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी मंत्री प्रा. वसंत पुरके, अध्यक्षस्थानी - आमदार बाळासाहेब मांगुळकर, विशेष - अतिथी म्हणून जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष अमन गावंडे, उद्योजक गजानन काळे हे प्रामुख्याने उपस्थित राहणार - आहेत. यावेळी यवतमाळ येथील नव नियुक्त नगरसेवक तथा युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद बगाडे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला व स्पर्धांना तालुक्यातील क्रीडाप्रेमींनी आवर्जुन उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अमेय घोडे, सरपंच कोंढा यांनी केले आहे.



## संक्षिप्त

### पुंडलीक वानखडे यांचे निधन

•युवाराष्ट्र दर्शन घाटंजी : येथील वसंतनगर मधील प्रतिष्ठित नागरिक श्री समर्थ विद्यालयातील सेवा निवृत्त कर्मचारी सुधाकर पुंडलिक वानखडे यांचे रविवार, 8 फेब्रुवारी रोजी दुपारी 2 वाजता निधन झाले. ते 70 वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कार सोमवार, 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता घाटंजी येथील मोक्षधामात होणार आहे.

### रेती चोरणाऱ्या दोघांवर गुन्हा

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ : खुनी नदीच्या टाकळी घाटावरुन रेती चोरुन नेणाऱ्या दोघांविरुद्ध वणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मारोती सोनेराव दहांजे (३७) रा. किन्ही ता. केळापूर आणि अजय गणपत सलाम (३५) रा. बोरी ता. केळापूर अशी या दोघांची नावे आहेत. ते विनापरवाना एक ब्रास रेती चोरुन नेत असताना आढळले. मंडळ अधिकारी मनोज नारायणराव चवरे (४७) यांनी त्यांना पकडले. तसेच त्यांच्या ताब्यातून रेती व ट्रॅक्टर ट्रॉली असा ५ लाख ६ हजारांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. त्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### दारु विक्रेत्यांकडून बापलेकास मारहाण

यवतमाळ : गावात दारु विकू नका असे म्हणताच दारु विक्रेत्यांकडून बापलेकास मारहाण करण्यात आली. ही घटना घाटंजी तालुक्यातील घोटी पारधी बेडा येथे ४ फेब्रुवारीला घडली. या प्रकरणी ७ फेब्रुवारीला उमेश भजन राठोड (२९) रा. पारधी बेडा घोटी यांनी घाटंजी पोलिसात तक्रार दाखल केली. आरोपींनी आपल्याला व आपल्या वडिलांना बैलगाडीच्या उभारीने गंभीर मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.



श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त उमरसरा परिसरातील गुरुमाऊली सोसायटीमध्ये सुर नवा ध्यास नवा रिॲलिटी शो फेम श्रुती जैन यांच्या कार्यक्रमाला नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी भेट दिली असता उईके यांचा गजानन महाराज मंदिर समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.



श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त उमरसरा परिसरातील गुरुमाऊली सोसायटीमध्ये राहणाऱ्या सौ प्रीती मुकुल मानकर यांनी रांगोळीतून रेखाटलेले गजानन महाराजांची प्रतिकृती.

# 'गण गण गणात बोते'च्या गजराने उमरसरा दुमदुमला

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ८ फेब्रुवारी

भक्तीचा महाकुंभ आणि टाळ-मृदंगाच्या गजरात, उमरसरा परिसरातील गणेश नगर येथे श्री गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव अत्यंत चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. योगिराज बहुउद्देशीय संस्था आणि राजू बोडखे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या सोहळ्याने संपूर्ण परिसराला आध्यात्मिक रूप प्राप्त करून दिले होते. रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी पहाटेपासूनच भाविकांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. सकाळी ७ वाजता जेव्हा श्रींची पालखी निघाली, तेव्हा भाविकांनी श्रद्धेने पालखी आपल्या खांद्यावर विसावून घेतली. "शेगावचा राणा" आणि "गण गण गणात बोते" या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. पारंपारिक वेशभूषेतील भाविक, टाळ-मृदंगाचा ठेका आणि वारकरी संप्रदायाचा हा अनोखा मेळ यवतमाळकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.





## पिंपळखूटा येथील जिल्हा परिषद शाळेत 'सिखें उत्सव'

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ८ फेब्रुवारी

बाभूळगाव तालुक्यातील पिंपळखूटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच 'सिखें इंडिया उत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि वर्षभरातील त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे सादरीकरण करण्यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'सिखे रॅली' काढून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. त्यानंतर शाळेत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष कामिनी घोंगडे, प्रवीण घोंगडे, प्रफुल्ल



इंगळे, मुख्याध्यापक मनोज श्रीवास, 'सिखें'चे सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले आदी उपस्थित होते.

सिखेंच्या वतीने शाळेत भाषा आणि गणित विषयावर शिक्षकांसोबत काम केले जाते. तर विद्यार्थ्यांना कार्यपुस्तिका देवून विविध घटक शिकवले जातात. या उपक्रमात विद्यार्थी वर्षभर काय शिकले याचे विविध मॉडेल विद्यार्थी प्रदर्शनातून मांडतात. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी गणितातील अपूर्णांकाच्या विविध संकल्पना, भाषेतील गोष्टीचे घटक, पुस्तक अशा विषयांवर आधारित प्रकल्प सादर केले. पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी अतिशय समर्पक आणि आत्मविश्वासाने उत्तरे दिली. पाल्यांची प्रगती आणि त्यांचा बोलका आत्मविश्वास पाहून पालकांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता विषयाची मूळ संकल्पना सखोलपणे समजून घेतली व त्याचे सादरीकरण केले तसेच गणितातील कठीण भागही दृश्यमान स्वरूपात सहजपणे समजावून सांगितला, अशी प्रतिक्रिया पालकांनी दिली. संचालन शिक्षिका श्रद्धा चौरे यांनी केले. प्रदर्शनीसाठी सिखेंचे जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे यांच्या मार्गदर्शनात कोच गोवर्धन गुल्हाने यांच्यासह शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## चिमुकल्यांनी नृत्याच्या माध्यमातून सांगितले मोबाईलचे दुष्परिणाम

### स्व.मोहनलालजी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन महागाव| प्रतिनिधी
दि. ८ फेब्रुवारी

स्व.मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात घे भरारी स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये रामलालजी पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूल मधील केजी २मधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मानवी जीवनात मोबाईल जितका चांगला तेवढ्या मोठ्याप्रमाणात त्याचे होणारे दुष्परिणाम आपल्या नृत्याविष्कारातून दाखवित उपस्थितांची मने जिंकुन घेतली.

महागाव येथील स्व. मोहनलालजी पुरोहित यांना कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात घे भरारी वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.



या स्नेह संमेलनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय मस्के तहसीलदार महागाव, प्रमुख अतिथी ठाणेदार धनराज निळे, नगराध्यक्षा सौ.सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रितेश पुरोहित, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,बाजार समितीचे सभापती रविंद्र पवार, बाजार समितीचे संचालक किशोर देशमुख,विनोद पाटील राऊत,नगरसेवक शैलेश कोपरकर, सुजित ठाकुर, भाजप शहराध्यक्ष निलेश नरवाडे, माजी उपनगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे, देवानंद पाटील दुपात्रे, शिवसेना उबाठा विधानसभा प्रमुख भिमराव भालेराव, महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर, पत्रकार विशाल डहाळे ,शेरखान पठाण, गोपी चक्करवार,संजय अमिलकंठवार यांच्यासह पालक उपस्थित होते. गीतावर रामलाल पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूलमधील मधील रियांशु धवसे,मोहन दलसिंगारे,सार्थक नरवाडे,अथर्व मिरासे, जैनाब पठाण,शर्वरी भंडारे, आराध्या पायघन, सान्वी राठोड या चिमुकल्यांनी बहारदार नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकुन घेतली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. जी. एस.स्वामी, प्रा.अनुप पवार,प्रा. वर्षा देशपांडे,प्रा. ए. टी. मुनेश्वर, प्रयोगशाळा सहाय्यक अमितकुमार चव्हाण,शीतल जाधव, अजेश पवार,इंग्लिश मिडीयम स्कूलच्या व्यवस्थापिका मालती भारती मॅडम,प्राचार्य विद्या ठाकरे,शिक्षिका रेश्मा राणे,वर्षा बर्डे,सृष्टी नरवाडे,प्रणिता दलशिंगारे, शंकर दलशिंगारे, बाळु ससाणे,गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य दिपक संगेवार यांनी केले तर आभार प्रा.गोरे यांनी मानले.

## सुनीताबाई दुधे स्मृती गुणवत्ता पुरस्काराचे वितरण

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रंगारंग 'कलाविष्कार'

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ८ फेब्रुवारी

अकोला बाजार येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेत सुनिताबाई भाऊरावजी दुधे स्मृती पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा किरण राजेंद्र नेवारे होत्या. सरपंच योगेश राजुरकर यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १९७२ ते १९८३ या कालावधीत कार्यरत असलेल्या शिक्षिका सुनीताबाई भाऊराव दुधे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. हा स्मृती पुरस्कार सुनीताबाई दुधे यांचे चिरंजीव तथा मीडिया वॉचचे संपादक अविनाश



दुधे यांच्या वतीने सन २०२० पासून दरवर्षी दिला जात आहे. यंदा वर्गातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात वर्ग १ ला – गुंजन संतोष घनकर, वर्ग २ रा – निरंजन प्रमोद दुपारते, वर्ग ३ रा – हुजैफ सलीम पठाण, वर्ग ४ था – कोमल गजानन मडावी, वर्ग ५ वा – अक्षरा गोपाल मडावी यांचा समावेश होता. स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरोगी स्पर्धा वाढून शालेय गुणवत्ता विकासाला चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी (शिक्षण) दिपिका गुल्हाने, मीडिया वॉच ग्रुपचे संपादक अविनाश दुधे, दैनिक नवराष्ट्र नागपूरचे उपसंपादक ज्ञानेश्वर मुंदे, संजय घुमनर, उपसरपंच प्रवीण मोगरे, पत्रकार हमीदखां पठाण, सचिन कोयरे, प्रवीण राठोड, राजु मादेशवार, अजय जगताप , प्रभु बंडीवार यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य राजू वगारहांडे, प्रकाश शेंद्रे, प्रकाश मोगरे, दिपक टिपले, विनोद चांदेकर, वैभव जाचक, आशिष परचाके, निमा नागोसे, फराहनाज शेख, सुलोचना इंदरवाडे, आरती नैताम, सुमन नेवारे तसेच मुख्याध्यापक राधेश्याम चेले व शिक्षीका नम्रता बिसने, प्रेमलता आत्राम, कुमुद डाखोळे, सोनल तिखिले, तृष्णा मेश्राम यांनी विशेष परिश्रम घेतले.

### दोन ऑटोच्या धडकेत महिला गंभीर जखमी

यवतमाळ : प्रवासी घेऊन निघालेल्या ऑटोरीक्षाला दुसऱ्या ऑटोरीक्षाने मागून धडक दिली. यात प्रवासी महिला खाली पडून गंभीर जखमी झाली. हा अपघात घाटंजी यवतमाळ मार्गावरील सावरगड गावाजवळ ६ फेब्रुवारीला दुपारच्या सुमारास घडला. एमएच २९ टी ७२६४ क्रमांकाच्या प्रवाशी ऑटोरीक्षाला एमएच २९ बीडी ०८९५ क्रमांकाच्या ऑटोने मागून धडक दिली. त्यामुळे एक महिला ऑटोतून खाली पडल्याने तिच्या डोक्याला मार लागला. या प्रकरणी सावरगड येथील युनुस खान समशेख खान (४५) यांनी ७ फेब्रुवारीला यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी एमएच २९ बीडी ०८९५ क्रमांकाच्या ऑटोरीक्षा चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## माजी आमदार केसरी दंगल कुस्तीचे आयोजन

### १६ वर्षांनंतर वणीत महिला व पुरुषांची भव्य दंगल कुस्ती

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
वणी, दि. ८ फेब्रुवारी

वणी शहरात दरवर्षी फेब्रुवारी ते मार्च या कालावधीत जत्रा मैदानावर श्री रंगनाथ स्वामी यांच्या नावाने तब्बल ३७ दिवसांची यात्रा भरते. या जत्रोत्सवानिमित्त पारंपरिक कुस्त्यांचे आयोजन करण्यात येते. मात्र दंगल कुस्तीचे आयोजन तब्बल १६ वर्षांपूर्वी करण्यात आले होते. त्यानंतर काही कारणास्तव दंगल कुस्ती बंद पडली होती.

यावर्षी मात्र दंगल कुस्ती पुन्हा सुरू करण्यासाठी पैलवान पांडुरंग लांजेवार यांनी पुढाकार घेतला असून, या उपक्रमाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासंदर्भात शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) सायंकाळी ५ वाजता श्री रंगनाथ स्वामी मंदिरात बैठक



घेण्यात आली. या बैठकीत यावर्षी दंगल कुस्तीचे आयोजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या बैठकीत दंगल कुस्तीची तारीख व ठिकाण निश्चित करण्यात आले नसून, पुढील बैठकीत याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार पुरस्कृत 'माजी आमदार केसरी दंगल कुस्ती' भरविण्यास बैठकीत एकमताने मंजुरी देण्यात आली आहे. या बैठकीस पांडुरंग लांजेवार, सुरेंद्र ईखारे, प्रमोद निकुरे, फारुख रंगरेज, इरफान शेख, शेख अकील, अशोक निकुरे, मोरेश्वर बरडे, विठ्ठल चौधरी, बंडू निंदेकर, बाबुलाल पोटदुखे, जहिर शेख, दिलीप खाडे, संतोष जोशी, सूर्यकांत मोरे, जॉन पोन्नलवार, अजय बोबडे, विजय थेरे, रमेश शर्मा, प्रा. दिलीप मालेकर, सुरेश रायपुरे, संदीप जयस्वाल, रमेश बावणे, कनैया पारखी, रमेश येरणे, दीपक पचारे, सुदामा सादवानी, परशुराम पोटे, महादेव दोडके यांच्यासह मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी व मान्यवर उपस्थित होते.

# नियम कागदावरच, शहर कचऱ्यात! नगरपालिकेचे दुर्लक्ष

## – ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर;नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे स्वतः उतरले मैदानात

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ८ फेब्रुवारी

यवतमाळ शहरातील कचरा संकलन व्यवस्थेचा बोजवारा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर असल्याने प्रभाग क्रमांक १० मध्ये कचरा उचलला जात नसल्याचे चित्र दिसून आले. या गंभीर परिस्थितीची दखल घेत यवतमाळ नगरपालिकेचे गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून स्वतः ई-रिक्षा



चालवत कचरा संकलन केले व नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या. विशेष म्हणजे यवतमाळ नगरपालिकेवर प्रशासक राज संपून भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन होऊनही शहर स्वच्छ व सुंदर होण्याऐवजी अस्वच्छतेकडेच वाटचाल सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे.कचरा संकलनाचा ठेका मिळालेल्या ठेकेदारांवर नगरपालिकेचा कोणताही प्रभावी अंकुश नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.ठेकेदारांकडून कामगारांची नियमित उपस्थिती, वेळापत्रकानुसार कचरा उचल, ई-रिक्षांचे रोजचे फेरे,गणवेश व ओळखपत्रांची अंमलबजावणी, तसेच स्वच्छता नियमांचे पालन केले जात नसल्याचे वास्तव समोर आले आहे. स्वच्छ भारत अभियान,महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार घराघरातून दररोज कचरा संकलन करणे, ओला-सुका कचरा वेगळा गोळा करणे,कर्मचारी नियमित हजर ठेवणे व ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करणे हे नगरपालिकेचे कर्तव्य आहे. मात्र प्रत्यक्षात या सर्व नियमांना हरताळ फासला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. डॉ. नीरज वाघमारे यांनी "नगरपालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी जबाबदारी झटकून चालणार नाही.ठेकेदार,अधिकारी व कामगार यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करून नियमभंग करणाऱ्यांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे,अन्यथा आंदोलन छेडले जाईल," असा इशारा दिला आहे. ही घटना म्हणजे केवळ एका प्रभागापुरती मर्यादित नसून संपूर्ण यवतमाळ शहरातील स्वच्छता व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.



## माता रमाई जयंतीनिमित्त अभिवादन

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी

रमाई माता जयंती निमित्त ढाणकी शहरातील बौद्ध विहारामध्ये अभिवादन करताना उमरखेड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील, स्वप्निल चिकाटे, प्रकाशजी पाईकराव व इतर नागरिक उपस्थित

**CHANGE OF NAME**

Old Name -**Jyotsna Ashokrao Kale**

New Name in Documents -**Jyotsana Sachin Dhote**

( Name change after Marriage)

I will hereafter use my New Name as

**Jyotsana Sachin Dhote** in all my transactions and deeds.

**Address - At. Musal Tah Kalamb,**

**Dist. Yavatmal 445323 M.S.**

# गोंदिया

युवाराष्ट्र दर्शन

जिल्हा

सोमवार दि.०९ फेब्रुवारी २०२६



**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**

मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**

जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०


## प्राणी–पक्ष्यांची संख्या वाढवून, पशुपालन व्यवसायाकडे लक्ष केंद्रित करा : आ. विनोद अग्रवाल




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती गोंदिया यांच्या वतीने कामठा येथील क्रीडा संकुल मैदानात भव्य तालुकास्तरीय प्राणी–पक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन परिषद ६ फेब्रुवारी रोजी आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते गौपूजन करून सुरू करण्यात आली.

या प्राणी–पक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन परिषदेत आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जे. के. तिटमे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. विनोद कोटांगले, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, उपसभापती शिवलाल जमरे, लक्ष्मण भगत (जिप अर्थ व बांधकाम सभापती), दीपाताई चंद्रिकापुरे (सभापती कृषी व पशुसंवर्धन), गटविकास अधिकारी जे. आर. देवरे (पंस गोंदिया), जिप सदस्य वैशाली पंधरे, आनंदा वाठोवा, रितेश मलगाम, लक्ष्मीताई तरोणे, रेखाताई जगणे (सरपंच कामठा), कलाताई भेंडारकर, शैलजाताई सोनवाने (पंस सदस्य), पृथ्वीसिंह नागपुरे, पोलिस पाटील उर्मिलाताई लिल्हारे, डॉ. आर. आर. निखारे (पशुधन अधिकारी, पंस गोंदिया) यांची तसेच पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

आपल्या संबोधनात आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हितासाठी पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी अशा प्रकारचे प्रदर्शन व मार्गदर्शन परिषदेचे आयोजन स्वागतार्ह आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर प्राणी–पक्ष्यांची संख्या ज्या प्रमाणात वाढायला हवी, त्यात मोठी घट झाली आहे. पूर्वीच्या जनगणनेनुसार एका व्यक्तीमागे ४० प्राणी–पक्षी असत; मात्र आज परिस्थिती उलटी आहे. शासन व जिल्हा परिषद–पंचायत समितीमार्फत पशुपालनाला चालना देणे, योजनांचा लाभ देणे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या व्यवसायातून आपण चांगली आर्थिक परिस्थिती निर्माण करू शकतो, उत्पादन वाढवू शकतो आणि पशुसंवर्धनाची कामे मजबूत करू शकतो. आमदार अग्रवाल पुढे म्हणाले, आपण शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला पाहिजे. सरकारतर्फे अनेक योजना राबवल्या जात आहेत. प्राणी प्रदर्शनाचे हे आयोजन या भागातील प्राणीसंपत्ती वाढीसाठी आणि संवर्धनासाठी योग्य पाऊल आहे. दूध उत्पादन, बकरीपालन यांसारख्या उपक्रमांमुळे उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण होत आहेत. पिक उत्पादनाबरोबरच पशुपालनावरही आपले लक्ष केंद्रित झाले पाहिजे.

## ग्रंथालय संस्थांना नियमांची सखोल माहिती असणे गरजेचे : दिशा पजई



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** ग्रंथालय संस्थांच्या संचालकांनी स्वतः तयार केलेले नियम समजून घेतले पाहिजेत. संस्थांनी वेळोवेळी चेंज रिपोर्ट सादर करून वाचनालये अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात सुरू असलेली लहान वाचनालये ही ज्ञानवृद्धीसाठी सकारात्मक पाऊल असून धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडून संस्थांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन सहाय्यक धर्मदाय आयुक्त दिशा पजई यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गुरुनानक ऑडिटोरियम हॉल येथे आयोजित दोन दिवसीय 'गोंदिया ग्रंथोत्सव' अंतर्गत परिसंवादात अध्यक्षस्थानावरून त्या मार्गदर्शन करत होत्या. वाचन ही स्वतःची आवड असल्याचे सांगत त्यांनी ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. संस्थांच्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी डॉ.कोटेवार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी उल्लेख केला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. विकास साठे, लेखापरीक्षक इरफान काझी, मनोज भांडारकर तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी मीनाक्षी कांबळे उपस्थित होते. ॲड. साठे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, संविधानाने शासनाला जबाबदारी दिली असली तरी केंद्र व राज्य शासनाच्या कार्याला मर्यादा आहेत. प्रत्येक स्तरावर देखरेख शक्य नसल्याने धर्मदाय आयुक्त कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. विश्वसनीय संस्थांचे नियंत्रण व मार्गदर्शन धर्मदाय कार्यालयामार्फत केले जाते. संस्थांनी उपनियम व धर्मदाय कायद्याचे पालन करणे अत्यावश्यक असून संस्थांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित संचालकांच्या विविध प्रश्नांची उत्तरे देत त्यांनी शंकानिरसन केले. लेखापरीक्षक इरफान काझी व मनोज भांडारकर यांनीही संस्थांच्या लेखा व प्रशासकीय बाबींविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंतराव भगत यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संतोष डोये यांनी मानले.

## स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी श्रीमती जयतुराबाई बिसेन सार्वजनिक वाचनालय परिसरातील एक विश्वसनीय माध्यम : खुशाल कटरे



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** बदलत्या शैक्षणिक वातावरणात इंटरनेट मोबाईल यांच्या वापराचे दुष्परिणाम नवीन पिढीवर होत असताना दिसत आहेत. दुष्परिणाम पासून जर विद्यार्थ्यांना दूर करायचे असेल तर साहित्याचे वाचन करणे दैनिक वर्तमानपत्रातून नवीन नवीन माहिती अर्जित करणे स्पर्धा पुस्तकांच्या अभ्यास करून स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करणे याशिवाय दुसरा उपाय नाही.

सुसंस्कारित पिढी घडविण्याचे मोठे कार्य गावागावात उभारलेल्या वाचनालय करीत आहेत.

तिरोडा तालुक्यातील चिरेखणी येथे १९९९ पासून सुरू असलेल्या श्रीमती जयतुराबाई बिसेन सार्वजनिक वाचनालय येथील एकूण नऊ वाचक शासकीय नोकरीत रुजू झाल्याने वाचकां दरम्यान नवचैतन्याचे वातावरण आहे. इतर वाचकांनी, प्रेरीत होऊन, स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीचे सातत्य कायम ठेऊन धारदार तयारी करावी. यश निश्चिच आपल्या पदरी पडल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन से.नि.प्राचार्य खुशाल कटरे यांनी केले. वाचनालय प्रशासनाच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन वाचनालय सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उच्च श्रेणी मुख्याध्यापक आर.टी.बिसेन, प्रमुख अतिथी म्हणून वाचनालयाचे अध्यक्ष घनश्याम पुनाजी पारधी, जीजामाता वाचनालय गोरेगावचे माजी अध्यक्ष खुशाल कटरे, मार्गदर्शक म्हणून गायत्री सार्वजनिक वाचनालय निमगावचे ललितकुमार रहांगडाले, आजीवन सदस्या सौ. हेमलताबाई रहांगडाले, संस्थेच्या सहसचिव सौ. कीर्ती छत्रपती बिसेन तथा सत्कारमूर्ती प्रमुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक वाचनालयाचे कोषाध्यक्ष प्राध्यापक छत्रपती बिसेन यांनी केले. वाचनालयाचे अध्यक्ष घनश्याम पुनाजी पारधी यांनी आवाहन केले की महाराष्ट्र शासन वाचकांना प्रेरणा मिळावी म्हणून गावोगावी वाचनालय सुरू केली.

हे वाचनालय चालविण्याकरता शासन तुटपुंजे अनुदान देते. खऱ्या अर्थाने या वाचनालयांचा विस्तार करायचा असेल तर लोकांनी जागृत होऊन, लोक वर्गणी गोळा करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून खेड्यांमधील बुद्धिवंत व होतकरू विद्यार्थी एकत्रित येऊन वाचनालयातील स्पर्धा पुस्तकांच्या मदतीने स्पर्धा पूर्व परीक्षेची तयारी करून आपले जीवन बनवू शकतात. याप्रसंगी वाचनालयाच्या त्या वाचकांना शासकीय नोकरी मिळालेले आहे, अशा वाचकांच्या व त्यांच्या पालकांच्या सत्कार करण्यात आला याप्रसंगी सत्कारमूर्ती म्हणून संकेत महादेव पुरम, अजय धनराज ठाकरे चांदनी प्रेमलाल रिनाईत, गिरीश दिगंबर ऊके उपस्थित होते. आभार ग्रंथपाल लक्ष्मीबाई बिसेन यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचक विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

## मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानांतर्गत मोहगाव बु. ग्रामपंचायतीची तपासणी




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोरेगाव :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकारी वासनिक यांनी गोरेगाव पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत मोहगाव बु. येथे शनिवार (दि.६) भेट देऊन कार्यालयीन दप्तर तपासणी करीत कार्यालयीन परिसरातील बगिचा, निर्मल जल प्लाँट, वाचनालयासह बचतगट भवन परिसराची पाहणी केली.

संपूर्ण राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा देखील या अभियानात समावेश असून अभियानांतर्गत प्रगती पाहण्यासाठी मुख्य कार्यकारी यांनी ग्रामपंचायतींच्या तपासणीच्या धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. यावेळी ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर वासनिक, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय लोंढे, गोरेगावचे गटविकास अधिकारी हेमराज गौतम यावेळी उपस्थित होते. दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाची पाहणी करून ग्रामपंचायतींच्या रेकॉर्डची देखील उपमुकाअ यांनी पाहणी केली. ग्रामपंचायतीच्यावतीने पाहणीकरीता आलेल्या सर्व अधिकारी वर्गाचे संत तुकडोजी महाराजांची भगवी टोपी घालून स्वागत करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत उपसरपंच कमलेश्वर रहांगडाले, ग्रामपंचायत सदस्य डिलेश्वर गौतम, चुनीलाल पटले, शिसुकुमार कटरे, दिलीप पटले, इंद्रराज येळे व इतर ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, या अभियानात ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर मिळून सुमारे सहा कोटी ६५ लाखांपर्यंतचे पुरस्कार मिळण्याची संधी आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या गुणांकनाकडे लक्ष द्यावे, आपली ग्रामपंचायत अधिकाधिक लोकाभिमुख आणि समृद्ध करण्यावर भर द्यावा, असे निर्देशही उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासनिक यांनी दिले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ग्रामपंचायतींच्या सबंध विकासावर भर देते. लोकसहभागासह लोकांना मिळणाऱ्या सोयीसुविधा यावर अभियानाचे गुणांकन आहे.

## धापेवाडा उपसा सिंचन योजनच्या सिंचनविषयक बाबींचा घेतला आ. रहांगडालेनी आढावा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** तालुक्यातील धापेवाडा उपसा सिंचन योजनेच्या प्रलबिंत कामाना घेत आमदार विजय रहागंडाले यांनी सिचंन भवन नागपूर येथे सिंचन विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांशी चर्चा केली. तसेच येत्या जुन पर्यंत सर्व कामे मार्गी लावण्याच्या सुचना दिल्या. या बैठकीला कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, मुख्य अभीयंता गोसे खुर्द जयंत गवळी, मुख्य अभियंता जलसंपदा विभाग श्री.चोपडे, अधीक्षक अभियंता संजय विश्वकर्मा, कार्यकारी अभियंता श्रीकांत मस्कावार उपस्थित होते.

धापेवाडा उपसा सिंचन टप्पा-१ अंतर्गत सिंचन सुरु असुन तेथील पंप नादुरुस्त असल्यामुळे फ़क्त २ मिमी. पाण्याचा प्रवाह होतो. परिणामी शेतक-यांच्या शेतात पाणी पोहचत नाही यावर उपाययोजना करणे महत्वाचे असल्याचे आमदार रहागंडाले यांनी बैठकित महत्व पटवून दिले. बोदलकसा उजव्या कालव्याद्वारे १६ गावातील ४१६२ हे. क्षेत्रास सिंचन नियोजीत आहे. त्यापैकी ४०१६.३८ हे. सिंचन झालेले आहे. सोनोली व भोंबोडी गावांना सालेबर्डी लघुकालव्यावरुन सिंचन होत असुन सदर कालव्याच्या दुरुस्तीची कामे चालु असल्याने सदर गावांत पाणी पोहचू शकले नाही. सिंचन प्रापणसुची २०२५-२६ अंतर्गत सदर कालव्याची कामे प्रगतीपथावर असुन जुन २०२६ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असल्याचे अधिक्षक अभियंता यांनी सांगितले.

## शेतात चिखलनी करताना ट्रॅक्टर उलटला : चालक ठार



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** शेतात चिखलनी करत असताना ट्रॅक्टर उलटून त्या खाली दबल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास अर्जुनी मोर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ताडगाव येथील शेतशिवारात घडली. प्रवीण किसन ब्राह्मणकर (४५) रा. पिंपळगाव/खांबी असे मृत ट्रॅक्टर चालकाचे नाव आहे.

ताडगाव येथील ताराचंद मोतीराम नाकाडे यांच्या शेतात चिखलनी करण्यासाठी गावातीलच नेताजी देवराम लांजेवार यांच्या मालकीचा ट्रॅक्टर (क्रमांक एमएच ३५ एजी ८२४४) भाड्यावर घेण्यात आला होता. दरम्यान, चिखलनीचे काम सुरू असतान ट्रॅक्टरची चाके चिखलात फसली त्यामुळे चालकाचे ट्रॅक्टरवरून नियंत्रण सुटले व ट्रॅक्टर चिखलात उलटला. ज्यामध्ये ट्रॅक्टरखाली दबल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. मृत प्रवीण याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार असून घरात तो एकमेव कमावता व्यक्ती होता. त्यातच त्याच्या अशा अपघाती मृत्यूने कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. घटनेची माहिती अर्जुनी मोरगाव पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोर येथे पाठविले. दुपारी ४ वाजता शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कमलेश सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली महेंद्र पुण्यप्रेडीवार करीत आहेत.

## विद्यार्थ्यांच्या संपुर्ण विकासासाठी सर्व सोई सुविधायुक्त शाळेची गरज : जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर

### वडेगाव येथे भव्य शालेय इमारत, अत्याधुनिक लॅब व बहुउद्देशीय रंगमंचाचे लोकार्पण

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तिरोडा :** जिल्हा परिषद हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, वडेगाव येथे नवनिर्मित भव्य शालेय इमारत, अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज फ्युचरीस्टीक प्रयोगशाळा तसेच बहुउद्देशीय रंगमंच यांचे लोकार्पण मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडले. या लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्षस्थान जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी भूषविले.

या प्रसंगी अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देणे पुरेसे नसून, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे अत्यंत गरजेचे आहे. शैक्षणिक प्रगतीचा पाया मजबूत करण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच अद्ययावत सुविधा मिळाल्या पाहिजेत, हाच जिल्हा परिषदेचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नवनिर्मित भव्य शालेय इमारत ही केवळ इमारत नसून, ती विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी आहे. अत्याधुनिक व फ्युचरीस्टीक प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होईल, प्रयोगशीलता वाढेल तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळेल, असे त्यांनी नमूद केले. डिजिटल युगात प्रयोगाधारित शिक्षणाला अधिक महत्त्व असून, अशा सुविधा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास करण्यास उपयुक्त ठरतील, असेही त्यांनी सांगितले.

बहुउद्देशीय रंगमंचाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. कला, क्रीडा, सांस्कृतिक



व सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, नेतृत्वगुण व व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो. या रंगमंचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल आणि त्यांचे कौशल्य समाजासमोर सादर करण्याची संधी प्राप्त होईल. शिक्षकवर्गाने या आधुनिक सुविधांचा योग्य उपयोग करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे, तर पालकांनीही आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषद शिक्षणाच्या दर्जात सातत्याने सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही अशा विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेष हर्षे, माजी अध्यक्ष व जि. प. सदस्य पंकज रहांगडाले, समाजकल्याण सभापती रजनीताई कुंभरे, पंचायत समिती सभापती तेजराम चव्हाण, जि. प. सदस्य तुमेश्वरी बघेले, पं. स. सदस्य दिपाली टेंभेकर, सरपंच शामराव बिसेन, माजी सभापती निता रहांगडाले, माजी जि. प. सदस्य सुनिता मडावी, पं. स. सदस्य यमु नंदेश्वर मात्री, सरपंच कल्पना दहिकर (चोरखमारा), सरपंच ज्योती देशमुख, उपसरपंच दिलेश्वरी गौत्तम, माजी जि. प. सदस्य संभाजी ठाकरे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

तसेच बाळकृष्ण सोनवाने, राजकुमार परले, गुड्डुभाऊ ठाकरे, मुन्ना सोनवाने, चौलेजी, भरत गुरव, निलकंठ बिसेन, चव्हाण (गटशिक्षणाधिकारी), शामरावजी, राजकुमार पटले, भोजराज पटले, केशर रहांगडाले, राठोड ताई, बावनकर ताई, रंजुताई अंबुले, कल्पना अंबुले, शिला ठाकरे, नंदेश्वरताई, सोनवणे ताई, सावित्री अंबुले, वामन धपाडे, मधु भेलावे, अशोक नंदेश्वर, सुधीर मेश्राम आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास आनंदराव गौतम (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती), निळुभाऊ बेनार, एम. आर. ठाकरे (केंद्रप्रमुख), अंकुष राठोड, सेवक अंबुले, एस. पी. ठाकरे (प्राचार्य), कुंदा बावनथळे (मुख्याध्यापक), रजनी बिंदारे यांच्यासह शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साही व सकारात्मक वातावरणात पार पडला. नव्या सुविधांमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय वाढ होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भवितव्याची दारे खुली होतील, असा आशावाद यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

## जाहीर सुचना

१) श्री. रामेश्वर खेतराम तिवारी २) श्रीनारायण प्रसाद खेतराम तिवारी इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. १९, वार्ड का नाम मुखर्जी वार्ड, मालमत्ता क्र. ६/२६ (A) है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि. १)२६/०६/१९९९, २)०९/०५/२००३ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) श्रीमती ममता नारायणप्रसाद तिवारी, २) संजय नारायणप्रसाद तिवारी, ३) संदीप नारायणप्रसाद तिवारी, ४) सौ. प्रिती अर्जुन जामवाल इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
सोमवार दि.०९ फेब्रुवारी २०२६

## अबाधा फाउंडेशन च्या वतीने आरोग्य शिबीर

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** दिनांक ७ फेब्रुवारी शनिवार ला बासोरा येथे अबाधा फाउंडेशन च्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वितरण शिबीर घेण्यात आले.

अबाधा फाउंडेशन ही एक सामाजिक संस्था असुन गेली १० वर्षापासुन समाजसेवेचे कार्य करित असुन अबाधा स्वास्थ या उपक्रमा अंतर्गत विविध तालुक्यातील विविध गावा मध्ये जाऊन आरोग्य शिबीर घेत असुन आरोग्या विषयी जनजागृती करणे व आरोग्या ची काळजी कशी घेतले पाहिजे असे विविध मार्गदर्शन करण्यात येते. आता पर्यत भंडारा जिल्ह्यात १२६७ गावा मध्ये आरोग्य शिबीर घेतले आहे. बासोरा या गावामध्ये शेकडो च्या संख्येने या शिबिराचा लाभ घेतला. या प्रसंगी. डॉ. भजनकर , तर औषध वितरण मनीषा मॅडम तर बी. पी. ऑपरेट पल्लवी मॅडम यांणी तर नाव नोंदणी तन्नू भुरे,भूमिका गुज्जर यांनी पार पडले तर या आरोग्य शिबिराचे नियोजन जय मोरे समन्वयक, व राहुल पटले यांनी केले तर रेखाताई चकोले सरपंच मॅडम यांनी व ग्रामस्थांनी आभार मानले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# तुमसर बाजार समितीच्या सचिवाकडुन महिला रोखपालाचा विनयभंगाचा प्रयत्न

### सचिवांवर गुन्हा दाखल; अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** तुमसर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय वर्तुळातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. समितीचे सचिव अनिल भोयर यांनी एका महिला रोखपालासोबत अश्लील वर्तन करून विनयभंग केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण बाजार समितीच्या वतुर्ळात खळबळ उडाली असून महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४:३० वाजताच्या सुमारास घडली. तक्रारदार महिला रोखपाल शासकीय कामाच्या निमित्ताने चेकबुकवर सही घेण्यासाठी सचिवांच्या दालनात गेल्या होत्या. यावेळी सचिवांनी कामाचा बहाणा करत महिलेला दालनात थांबवून घेतले. मी तुमच्यासाठी नेहमी चांगला विचार करतो, पण तुम्ही माझे न ऐकता दुसऱ्यांचे ऐकता, असे म्हणत सचिवांनी पीडितेचा डावा हात पकडून तिला स्वतःकडे ओढले. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी सचिवाचा उद्देश अत्यंत हीन दर्जाचा होता. त्याने पीडितेला मला किस करू दे, अशी मागणी करून तिच्या लज्जेचा भंग केला. यावेळी झालेल्या झटापटीत पीडितेच्या हातातील बांगड्या फुटल्या. तिने सचिवांचा हात झटकून बाजूला होण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने दालनाचे उघडे असलेले दरवाजे आणि खिडक्या तातडीने बंद करून महिलेला आत कोंडून दबावाचा प्रयत्न केला. महिलेला दालनात बंद केल्यानंतर आरोपी सचिव तिच्या जवळ गेला. का घाबरता? काही होत नाही. माझे तुम्ही काहीच करू शकत नाही, अशा शब्दांत तिला धमकावू लागला. मात्र पीडितेने न डगमगता त्याला ठणकावून जाब विचारला आणि जोरजोराने ओरडण्यास सुरुवात केली. महिलेची आरडाओरड ऐकून कुणीतरी येईल, या भीतीने अखेर सचिवांनी दालनाचे दार उघडले आणि तेथून पळ काढला.

> यापूर्वी अश्या अनेक कटकारस्थाने षडयंत्र रचून मला फसविण्याचे प्रयत्न केले होते. मात्र यावेळी अती खालच्या पातळीवर जाऊन चुकीचे आरोप करण्यात आले. यामुळे मला मानसिक त्रास झाले असून आता कायदेशीर लढाई लढणार आहे.
>
> **-अनिल भोयर, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसर.**
>
> बाजार समितीचे सचिव हे अश्या चुकीचे काम करू शकत नाही त्यामुळे केलेल्या आरोपांची चौकशी केली पाहिजे. यासंदर्भात सभापती तुमसरे यांना निवेदन दिले आहे. यार्डात कार्यरत असलेल्या सर्व कामगार म्हणून आम्ही सचिवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.
>
> **-चंद्रशेखर सेलोकर, माजी संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसर.**

याप्रकरणी पीडित महिला रोखपालाने दिलेल्या तक्रारी वरून पोलिसांनी अपराध क्र. १०७/२०२६ व भारतीय न्यायसंहितेच्या कलम ७४, ७५ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुराव्यादाखल फुटलेल्या बांगड्या गोळा केल्या आहेत. दरम्यान, आरोपी सचिव अनिल भोयर यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली असून या प्रकरणातील पुढील कायदेशीर कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पिकअपची दुचाकीला धडक, युवक ठार

### तुमसर-भंडारा मार्गावरील मोहगाव (देवी) परिसरातील घटना

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने २९ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. हा भीषण अपघात तुमसर-भंडारा मार्गावरील मोहगाव (देवी) गावाजवळ शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास घडला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दिगंबर तुरकर असे मृताचे नाव दिगंबर तेजलाल तुरकर (२९, रा. डोंगरगाव, ता. जि. गोंदिया) असे मृत युवकाचे नाव आहे. दिगंबर हा नागपूर येथील एका रिअल इस्टेट कंपनीत कार्यरत होता. शनिवारी तो आपल्या दुचाकीने (क्रमांक एमएच ३१ 31 ऋ ५३७३) कामाच्या निमित्ताने तुमसरकडून नागपूरकडे जात असताना काळाने त्याच्यावर झडप घातली.

अपघाताचा थरार प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मोहगाव (देवी) गावाजवळ दिगंबरने समोर जात असलेल्या एका ट्रकला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याच वेळी समोरून येणाऱ्या भरधाव पिकअप वाहनाची आणि त्याच्या दुचाकीची समोरासमोर भीषण धडक झाली. धडक इतकी जोरात



होती की दिगंबर रस्त्यावर फेकला गेला आणि मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता, हे दृश्य पाहून उपस्थितांचे काळीज पिळवटून निघाले.

अपघातानंतर तुमसर-भंडारा मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच वरठी पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला.

अपघाताची माहिती मिळताच दिगंबरच्या नातेवाईकांनी वरठी पोलीस ठाण्यात धाव घेतली. आपल्या घरातील तरुण मुलाचा असा अचानक अंत झाल्याचे पाहून नातेवाईकांनी केलेला विलाप हृदय पिळवटून टाकणारा होता. वरठी पोलीसांनी अपघाताची नोंद केली आहे.

### उमेद महिला बचत गटांचे वस्तु विक्री व प्रदर्शन ११ ते १४ दरम्यान

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा:** उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत दारिद्र रेषेखालील कुटुंबाचे जीवनमान उंचावणे व त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी स्वयं सहायता गटांनी तयार केलेल्या उत्पादीत वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा उद्देशाने जिल्हास्तरीय महिला बचत गटांचे वस्तु विक्री व प्रदर्शनी जिल्हा स्तरावर आयोजित करण्याचे नियोजन झालेले आहे. त्याअनुषंगाने जिल्हा स्तरीय विक्री प्रदर्शनी स्वयं सहायता गटांनी उत्पादीत केलेल्या मालाचे विक्री व प्रदर्शनी दिनांक ११ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दसरा मैदान, शास्त्री चौक, वरठी रोड भंडारा येथे आयोजित करण्यात येत आहे.

# मोहाडी पं. स. लेखापालची लाच प्रकरणातून निर्दोष सुटका

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** पंचायत समिती मोहाडी येथे लेखापाल (अकाऊंटंट) म्हणून कार्यरत असलेले अखिल पारधी यांना लाचलुचपत प्रकरणात विशेष न्यायालयाने निर्दोष घोषित केले आहे. विशेष न्यायाधीश भंडारा श्री. अतुल शाह यांनी नुकताच हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

तक्रारदार नरेश लिमजे यांनी आपल्या शेतातील धडक सिंचन योजनेअंतर्गत मंजूर विहिरींचे बिल काढण्यासाठी अखिल पारधी यांनी ५,००० लाचेची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत विभाग, भंडारा येथे केली होती. या तक्रारीच्या आधारे लाचलुचपत विभागाने पडताळणी करून सापळा कारवाई केली व पारधी यांना अटक केली. त्यानंतर संपूर्ण तपास करून आरोपपत्र भंडारा न्यायालयात सादर करण्यात आले.

सदर खटल्यात तक्रारदार, पंच साक्षीदार आणि नियुक्ती अधिकाऱ्यांच्या साक्षी तपासण्यात आल्या. मात्र न्यायालयीन सुनावणीत पंच व तक्रारदार यांच्या साक्षींमध्ये तफावत आढळली. आरोपी व तक्रारदार यांच्यातील कथित लाच मागणीचे संभाषण पंचाने स्पष्टपणे ऐकले नसल्याचे समोर आले. तसेच संबंधित निधी मंजुरीचे काम हे आरोपीच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचेही न्यायालयाने नोंदवले.

याशिवाय, आरोपपत्र दाखल करण्यासाठी देण्यात आलेली मंजुरी ही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही शहानिशा न करता व सद्सद्विवेकबुद्धीचा वापर न करता दिल्याचा निष्कर्ष न्यायालयाने काढला. या सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने अखिल पारधी यांची निर्दोष सुटका केली. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. राजेश राऊत, ॲड. सारंग राऊत आणि ॲड. निश्चय राऊत यांनी प्रभावी बाजू मांडली.

# सिंदपुरी येथे म.अनीस च्या वतीने सभासद होण्याचे आवाहन




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** आज दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजा सिंधपुरी त. पवनी जिल्हा भंडारा येथील अपना घर वृद्ध आश्रमला म.अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट दिली.

आश्रमाचे संचालक राजेश दत्तू मेश्राम यांनी म.अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे ऑनलाइन सभासद नोंदणी केली होती. त्यामुळे सविस्तर चर्चा करून त्या ठिकाणी डॉ. मनोहर गजभिये, शामराव शेंडे यांनी नवीन सभासद फॉर्म भरले संघटनेच्या कार्यात सहभागी झाले.

यावेळी शाहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे , पुरुषोत्तम गायधने यांनी त्यांच्या वृद्धाश्रमातच त्यांना पुस्तक देऊन त्यांचे कौतुक, अभिनंदन केले. सिंधपुरी या ठिकाणी हजारोच्या संख्येने बौद्ध धम्म संमेलन या कार्यक्रमला भीमसैनिक आले असल्यामुळे या ठिकाणी आय.एल. नंदागवळी राष्ट्रीय अध्यक्ष आंबेडकरवादी संघर्ष पार्टी यांनी भव्य दिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विविध विषयावर त्यांचे मार्गदर्शन सुरू होते. त्या ठिकाणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भूमिका, समितीचे कार्य मांडण्याची संधी दिली व लोणारे यांचे शाल व पुष्प देऊन अभिनंदन केले त्यामुळे संघटनेच्या कामाविषयी लोणारे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. नागरिकांना सभासद होण्याचे आवाहन केले. यावेळी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# नेहरू नगर भोजापूर येथे रमाई जयंती उत्साहात

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :-** दि. ७ फेब्रुवारी रोजी लोकायत बहुउद्देशीय संस्था नेहरू नगर भोजापूर येथे त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष योगेश मेश्राम यांच्या हस्ते माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती प्रज्वलित करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक बौद्ध वंदना ग्रहण करून माता रमाई यांना पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

यावेळी वक्त्यांनी रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावली असून त्याग, समर्पण व संघर्ष यांचा समानार्थी शब्द म्हणजे रमाबाई असे विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताच्या संविधानाचे शिल्पकार असले, तरी त्यांच्या जीवनाच्या घडणीत रमाबाईंचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात



आले. कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष योगेश मेश्राम, संस्था सचिव नरेंद्र गणविर, प्रा. डॉ. विजय गणविर, प्रा. डॉ. महेशकुमार भैसारे, संस्था कोषाध्यक्ष ऋषी गोस्वामी, सुरेंद्र मेश्राम, देवेंद्र धारगावे, दिपाली भोरे, वर्षा गणविर, राहुल रामटेके, मंजिरी भोरे, अंश बोरकर, रत्नघोष भालाधरे, इंदिरा,भालाधरे यांच्यासह नेहरू नगर व अंबिका नगर भोजापूर येथील महिला, पुरुष तसेच लहान बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. राहुल भोरे यांनी केले.



## शितलामाता मंदिरात गजानन महाराज प्रगट दिन साजरा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा:** गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त शितलामाता मंदिर खांबतलाव भंडारा येथे पोथी वाचन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

शितलामाता मंदिर येथील गजानन महाराजांच्या मूर्तीसमोर सकाळी पोथीचे वाचन करण्यात आले.यानंतर आरती व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. महाप्रसादाला भाविकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पराग महांकाळ,सौ.प्राजक्ता महांकाळ,राधा ढोमणे,निता ऐखंडे,नमिता मोहबे, सारंग महांकाळ,हेमंत चंदवासकर, सारंग पांडे,डॉ.अनुप पोफळी,राजू मोहबे, मोहन पडोळे,प्राची महांकाळ,सोनाली पांडे यांनी परिश्रम घेतले.

# रमाईमुळे बाबासाहेब घडले - विजय सावरबांधे

### मोहरी (चौ) येथे जयंती सोहळ्यात प्रतिपादन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**पवनी :** माता रमाईचा त्याग, हिम्मत व अखंड साथ यामुळे बाबासाहेबांना देशातील बहुजनांचा उद्धार करता आला. त्यांना विश्वभूषण बनविण्यात रमाईचे मोठे योगदान आहे असे सांगून रमाईमूळे बाबासाहेब घडले असे प्रतिपादन राष्ट्रवादी कांग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय सावरबांधे यांनी केले. ते मोहरी(चौ) येथे आयोजित त्रिदिवसीय माता रमाई जयंती उत्सव समारोहाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

प्रज्ञा शील करुणा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गट ग्रामपंचायत व समस्त ग्रामवासी मोहरी ता. पवनी यांच्या संयुक्त विद्यमान त्रिदिवसीय कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उदघाटक शैलेश मयूर तर अध्यक्ष म्हणून विजय सावरबांधे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती माजी सभापती सुनील जीवनतारे, पंचायत समिती सदस्य चंद्रशेखर पडोळे, संपादक मनोहर मेश्राम, सितकुर गेडाम, मधुकर जांगळे, अशोक गभने, मोहन लांजेवार, दिलीप सावरबांधे इत्यादी उपस्थित होते.

विजय सावरबांधे पुढे म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा उच्च शिक्षणासाठी विदेशात गेले तेव्हा रमाबाईंनी अत्यंत कठीण परिस्थितीत संसार सांभाळला. शेणी-गोवऱ्या वेचून प्रसंगी उपाशी राहून संसाराचा गाडा हाकला पण बाबासाहेबांच्या ध्येयात कधीही अडथळा येऊ दिला नाही. चार मुले दगवल्याचा दुःखद प्रसंग त्यांनी एकटीने सोसला असे सांगून माता रमाईचा त्याग आजच्या महिलांनी स्मरणात ठेवावा असेही म्हणाले.

कार्यक्रमाचे उदघाटक सामाजिक कार्यकर्ते शैलेश मयूर यांनी बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीत




त्या केवळ पत्नी नव्हत्या तर एक भक्कम आधारस्तंभ होत्या. त्यांच्यामुळेच बाबासाहेब बहुजनांच्या उद्धारासाठी व देशहितासाठी काम करू शकले असे सांगून प्रत्येकांनी त्यांची प्रेरणा घ्यावी असे म्हटले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झालीत.

कार्यक्रमाचे संचालन एसटी वाहक बन्सोड यांनी केले. दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, मोफत नेत्र तपासणी शिबीर, संगीतमय समाज प्रबोधन, बुद्ध -भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला आहे.

# ओबीसी समाजावर बाबासाहेबांचे अधिक उपकार : प्रा.डॉ. नागेश गवळी

### मिनी दिक्षाभूमी सिल्ली येथे माई रमाबाई यांचा १२८ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सिल्ली/आंबाडी:-** हिंदू कोड बिल लागू करण्यासाठी कायदामंत्री पदाचा राजीनामा देणारे भारतातील एकमेव नेते म्हणजे डॉ. बाबासाहेब! ओबीसी समाजाला आरक्षण देण्यासाठी घटनेत आधी ३४० कलम लिहिले, त्यानंतर ३४१ एससी व ३४२ एसटीचा विचार केला.त्यामुळे बाबासाहेब केवळ दलितांचे नेते नसून संपूर्ण भारताचे भाग्यविधाते असून ओबीसी समाजावर बाबासाहेबांचे अधिक उपकार आहेत. त्यामुळे बाबासाहेबांना जाती जातीत वाटून घेणे म्हणजे त्यांचे विचार बंदिस्त करणे होय, असे प्रा. डॉ. नागेश गवळी यांनी प्रतिपादन केले.

उदघाटन प्रगती महिला महाविद्यालयाच्या प्रा.डॉ. क्रिष्णा पासवान/मेश्राम यांनी केले.अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी (प्राथ.) रवींद्र सोनटक्के, मुख्यवक्ते प्रा. डॉ. नागेश गवळी, माध्य.उपशिक्षणाधिकारी रमाकांत झाल्टे, माजी प्राचार्य अनमोल देशपांडे, विनोद विद्यालयाचे प्राचार्य दादाराव मस्के, प्रा. दिगांबर रामटेके, माजी प्राचार्या रमेश जांगळे प्रा. प्रेमलाल आत्राम, ग्रा. स.




कमलाकर अहिर, समीर गभणे, जेष्ठ महिला कांताबाई चव्हाण, जेष्ठ नागरिक प्रकाश हुमणे,बौद्ध विहाराचे अध्यक्ष रंजित हुमणे इत्यादी उपस्थित होते.

त्यागमूर्ती माई रमाबाई यांच्या १२८ व्या जन्मोत्सव सोहळानिमित्त मिनी दिक्षाभूमी सिल्ली येथे शनिवारी पुढे बोलतांना ते म्हणाले, रमाईचा त्याग व बाबासाहेब यांच्या कष्टातून दिन दलितांच्या आयुष्याला सोन्याचे दिवस आले. त्यामुळे जगाच्या पाठीवरचा आदर्श जोडपा म्हणजे रमाई व डॉ. बाबासाहेबांचा आहे.

हजारो वर्षापासून जातीवादाच्या रोगाने त्रस्त झालेल्या पिढ्यांना जातीयेतेच्या बांधनातून मुक्त करण्यासाठी बाबासाहेबानी संविधान नावाची लस आणली.आणि अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेला समाज ज्ञानाच्या प्रवाहात आला. अनिष्ठ रूढी आणि अंधश्रद्धेच्या जाचाविरुद्ध बाबासाहेबांनी शिक्षणाचे चाक फिरवले आणि संपूर्ण समाजाला शिक्षणाची गती मिळाली.म्हणून आमच्या कमरेचे झाडू आणि गळ्यातील मडके गेले.आम्ही माणसात आलो,असे त्यांनी मत व्यक्त केले.

> **होतकरू विद्यार्थ्यांचा सत्कार...**
>
> कठीण परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रात सुवर्ण पदक, ब्रांझ व रजत पदक मिळविणारे तनुश्री पद्माकर गजभिये, ऋत्विक रविंद्र गजभिये,वंशिका नरेंद्र हुमणे, सम्यक अनिल जांगळे,अवनी समरीत मेश्राम तसेच शासकीय सेवेत रुजू झालेले पूनम दिपांकर गजभिये,दिव्या निशांत हुमणे,संदीप अनिल सुर्यवंशी, प्रगती प्यारेलाल मेश्राम यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विहाराचे सचिव राजेश मेश्राम यांनी केले, संचालन लोकमतचे पत्रकार विलास खोब्रागडे यांनी केले.आभार संदीप गजभिये यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता बुद्ध विहार समितीचे प्रमोद बन्सोड,जागेश्वर बडगे, विवेक गजभिये, लोकेश मेश्राम, सुहास गजभिये, संदिप गजभिये, शैलेश मेश्राम,प्रशील मेश्राम, दिपक मेश्राम, रसूल मेश्राम, चंद्रमनी सरादे, सुमेर मेश्राम, अनुज गजभिये, संजय मेश्राम, अंबादास गजभिये किशोर वासनिक, दिगंबर मेश्राम, उमेश तिरपुडे,सुरेश मेश्राम, प्रदीप मारोती मेश्राम पत्रकार उल्हास तिरपुडे इत्यादींनी सहकार्य केले.

**एजन्सी देणे आहे**

हिंगणघाट येथे दै.युवाराष्ट्र दर्शनची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा, वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०१२०५८३७२

**एजन्सी देणे आहे**

हिंगणघाट येथे दै. महासागरची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०११०५८३७२

# रानडुकराच्या कळपाने फस्त केले चण्याचे पीक

## आबादकिन्ही शेत शिवारातील घटना

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आष्टी(श), दि. ०८

तालुक्यातील जंगलाशेजारील आबाद किन्ही शेत शिवारात रानडुकराच्या कळपाने शेतात धूडगुस घालून एक एकरातील चणा पिकाचे मोठे नुकसान केले असुन यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. ही बाब दि.७ रोजी पहाटे दरम्यान आबादकिन्ही शेत शिवारातुन उघड झाली.



येथील अल्प भू धारक शेतकरी नामदेव वामन झामडे यांचे आबाद किन्ही शिवारात सर्वे नं ४/२क्रमाकांचे शेत आहे. या शेतात एक एकरामध्ये चार महिन्यापूर्वी चणा पिकाची पेरणी केली. चणा पिकावर वन्य प्राण्याने ताव मारून फस्त केले आहे. शेतक-याने पिकाची वाढ होण्यासाठी निंदण, फवारणी केली तसेच वन्य प्राणी शेतात येऊ नये म्हणून सौर ऊर्जा कुंपण लावले. याकरिता शेतक-याला मोठा खर्च आला. मात्र दि. ७फेब्रुवारी रोजी पहाटे शेतकरी झोपेत असताना रान डुक्कराचा कळप चणा पिकात घुसला आणि एक एकरातील चणा पीक खाऊन फस्त केले. झोपेतून उठल्यावर पाहतो तर शेतात वन्य प्राण्यांचा कळप दिसला.यामध्ये शेतक-याचे एक लाख रुपयाचे नुकसान झाले असा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली असून चौकशी व घटना स्तळं पाहण्यासाठी बिट गार्ड बुरे यांनी शेतात जाऊन पाहणी केली.

# अमंली पदार्थाची विक्री,स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## ५२४ ग्रॅम गांजा ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि.०८

अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखेस आदेशीत केल्याने, त्या अनुषंगाने अंमली पदार्थांची विक्री करणा-या गुन्हेगारांवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहिम राबवित आरोपीचे ताब्यातुन ५२४ ग्रॅम गांजा अमली पदार्थ, दुचाकी व मोबाईलसह ८८हजार १०० रू चा मुद्देमाल जप्त करीत आरोपीविरूध्द पो.स्टे. हिंगणघाट येथे एनडिपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.



स्थानिक गुन्हे शाखे पथकाने पोलीस स्टेशन हिंगणघाट हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना, त्यांना स्वीपर कॉलनी महात्मा फुले वार्ड हिंगणघाट येथील सराईत गुन्हेगार प्रमोद छन्नु सांडेकर हा गांजाविक्री चा अवैध व्यवसाय करीत असुन, तो एमएच -३१,बी क्यू ३०७५ क्रमांकाच्या मोटर सायकलने हिंगणघाट परीसरातील शहालंगडी मंदिर ते दालमिल मार्गे हायवेकडे जाणा-या रोडलगत असलेल्या अतीक्रमणवरील त्याचे झोपडीमध्ये गांजा अंमली पदार्थांची विक्री करीत आहे, अशा माहितीवरून पथकाने त्याचे झोपडीमध्ये एन.डि.पी.एस. कायद्यान्वये रेड केला असता आरोपी तेथे हजर मिळुन आला असुन, झडती दरम्यान त्याचेजवळ गांजा अंमली पदार्थ मिळुन आल्याने, जागीच जप्ती पंचनामा कार्यवाही करून ५२४ ग्रॅम गांजा अंमली पदार्थ, दुचाकी व मोबाईलसह ८८हजार १०० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक सलाम कुरेशी, अमंलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांनी केली.

# महिलांना ३१ मार्चपर्यंत ई-केवायसीत सुधारणा करण्याची संधी




## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि.०८

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायशी करतांना चूकीचे पर्याय निवडण्यात आल्याचे अनेक महिलांचा लाभ बंद झाला होता. अशा महिलांना ई-केवायसी मध्ये सुधारणा करण्याची संधी दिनांक ३१ मार्चपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांचे ई-केवायशीच्या माध्यमातून दि.३१ डिसेंबर पर्यंत आधार प्रमाणीकरण करण्यात आले. परंतु सदर प्रक्रिया पूर्ण करतांना लाभार्थी महिलांकडून लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबत पर्याय निवडतांना चुकीचा पर्याय निवडला गेल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करुन लाभार्थ्यांच्या पात्रता, अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी करण्याबाबत शासनस्तरावरून जिल्हाधिकारी यांना दि.२० जानेवारी रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले होते. तथापि सदर लाभार्थ्यांची जलदगतीने पडताळणी करण्याकरिता ऑनलाईन ई-केवायशी मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी योजनेच्या लाभार्थ्यांकडून व क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात आली होती. त्यानुषंगाने ऑनलाईन ई-केवायशी मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

त्यानुसार ई-केवायसी करतांना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडतांना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन ई-केवायशी मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि.३१ मार्चपर्यंत पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# सुख-दुःखाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळविण्याचे साधन म्हणजे भागवत कथा - हभप रासवे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

देवळी,दि.०८

मनुष्य जन्माला आल्यानंतर आपल्या पूर्वजन्माप्रमाणे प्रत्येकाच्या वाट्याला सुख-दुःख येत असते. या सुख-दुःखाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळविण्याचे साधन म्हणजे भागवत कथा असून, यामुळे आत्यंतिक दुःखाची निवृत्ती व परमआनंदाची प्राप्ती होत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.महेश महाराज रासवे यांनी केले. कथेचा सारांश भागवतप्रेमींना स्पष्ट करुन दिला.



देवळी येथे श्री. क्षेत्र ज्ञानेश्वर माऊली देवस्थान नांदोरा(डफरे) च्या वतीने संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन ३१ जाने ते ०७ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते. कथेचे वाचन ह.भ.प. नरेश महाराज यांच्या अमृत वाणीतून करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाला माजी खासदार रामदास तडस,, भानुदास महाराज डफरे, निलेश बोटफोले, निवृत्ती हाडके, रामभाऊ भोयर, ऋषिकेश डफरे, गजानन डफरे, मनोज डफरे, अनिल देशमुख, गुणवंत वरके, अशोक डफरे उपस्थित होते.यावेळी समारोपीय कार्यक्रमात बोलताना माजी खासदार तडस म्हणाले की, जीवनात परिवर्तन करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने संतानी केले. तुमच्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर ते आपल्या विचारामुळेच शक्य होत असते. माणसाची वृत्ती ही तेवढीच महत्वाची आहे. जीवनात परिवर्तन आणायचे असेल तर सत्संग महत्वाचा आहे असे ते म्हणाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. क्षेत्र ज्ञानेश्वर माऊली देवस्थान नांदोरा(डफरे)चे विश्वस्तांनी तसेच ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपा पक्षात प्रवेश




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

समुद्रपूर ,दि०८

आमदार समीर कुणावार यांचे कार्यशैलीने प्रभावित होऊन स्थानिक समुद्रपूर तालुक्यातील ताडगाव येथील मीना छोयले यांचे सह यांचेसह असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात पक्षप्रवेश घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, माजी जिल्हा परिषद सदस्य मंदा चौधरी, माजी पंचायत समिती उपसभापती योगेश फूसे, ज्येष्ठ नेते रवी ठोंबरे, भाजपा नेते मनोज बारसकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार समीर कुणावार यांनी मीना छोयले यांचेसह असंख्य कार्यकर्त्यांना भाजपाचा शेला देऊन सन्मान केला.

यावेळी मीना छोयले यांचेसह सावित्रा चव्हाण, दुर्गा चौधरी, अस्मिता ढोणे, योगिता ननावरे, कलावती श्रीरामे, विमल दडमल, सुनंदा दडमल , रुंदा दडमल , कुसुम चौके, मारुती मसराम, ऋषी नन्नावरे, गुलाब रंधई, प्रदीप दडमल आदी कार्यकर्त्यांना भारतीय जनता पक्षात प्रवेश देण्यात आला.

# शिवीगाळ करण्यास हटकलल्यावरुन विट मारुन केले जखमी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०८

पैसे परत करण्यास वेळ लागतो, असे सांगितले असता शिवीगाळ करण्यास हटकल्यावरुन वीट मारुन जखमी करण्यात आल्याची घटना हिंगणघाट तालुक्यातील वेळा येथे घडली, याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, हिंगणघाट तालुक्याच्या वेळा येथे घडली, याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, हिंगणघाट तालुक्याच्या वेळा येथील अरुण शामराव पंडित यांना हिंगणघाट येथील अरविंद वाघमारे पैसे मागण्यास आले, त्यावेळी अरविंद वाघमारे यांना पैसे द्यायला दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागेल, असे सांगितले, त्यावरुन अरविंद वाघमारे याने शिवीगाळ सुरु केली, शिवीगाळ करण्यास हटकले असता अरविंद वाघमारे याने वीट मारुन अरुण पंडित यांना जखमी केले, याप्रकरणी तक्रारीवरुन हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# मध्यरात्री भरधाव वेगाने जाणारी मिक्सर मशीन पलटी

## r बोटोणा गावाजवळील घटना r चालक सुदैवाने बचावला



आष्टी(श)दि.०७

कारंजा (घा.)तालुक्यातील नारा येथील सिमेंट मिक्सिग प्लांटमधून सिमेंट गिट्टी मिक्स केलेले मटेरियल भरून मिक्सर मशीन आष्टी तालुक्यातील बोरखेडी गावाजवळ सुरु असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाकरिता मटेरियल घेऊन भरधाव वेगात एमएच १२एमएक्स ९७९३ क्रमांकचा मिक्सर चालकांच्या निष्काळजीपणामुळे पलटी झाला.यामध्ये झालेल्या अपघातात चालक गंभीर जखमी झाल्याचे समजते.

सविस्तर असे कि,

आष्टी तालुक्यातील बोरखेडी येथील गावाजवळ मध्य रात्री सिमेंट रस्त्याचे काम सुरु आहे. त्या कामाकरिता मिक्स केलेले सिमेंटचे मटेरियल हे मिक्सर मशीनने कारंजा तालुक्यातील नारा प्लांटमधून आणल्या जाते. प्लांटमधून भरधाव वेगात निघालेला मिक्सर अचानक बोटोणा गावाजवळ येताच मंदिर परिसरात पलटी झाला. मिक्सर मशीनचा चेंदामेंदा झाला असून चालक गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. रात्री रस्त्यावर कुणीच नसल्याने मोठी दुर्घटना टळली. रात्री काम करणाऱ्या कंपनीतील वाहने समोरून येणाऱ्या वाहणाऱ्या साईट देत नाही त्यामुळे असे अपघात घडतात. मिक्सर मशीन चालविणारे चालक हे दारूच्या नशेत असतात अशी माहिती प्राप्त झाली.

रस्त्यावर पडून असलेल्या मिक्सर मशीनला बाजूला करण्यासाठी काम सुरु होते.

# पालकमंत्री डॉ. भोयर यांनी घेतला पदवीधर मतदार नोंदणीचा आढावा









धीरज कासारे

कारंजा(घा), दि. ०८

पदवीधर निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आर्वीविधानसभाक्षेत्रातील तिन्ही तालुक्यांच्या पदवीधर मतदार नोंदनीचा आढावा घेतला. यावेळी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी मतदार नोंदणी व नियोजनाबाबत सविस्तर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आर्वी येथे आमदार सुमित वानखेडेयांच्याजनसंपर्ककार्यालयात आयोजित बैठकीला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर,आमदार सुमित वानखेडे, माजी आमदार सुधाकर कोहळे, नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, भाजपचे जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर, विजय वाजपेई, आर्वी ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र ठाकरे, शहर मंडळाचे अध्यक्ष राहुल गोडबोले आदी उपस्थित होते. तसेच तळेगांव श्यामजीपंत येथे आयोजित बैठकीला आमदार सुमित वानखेडे, कमलाकर निंभोरकर, मंडळ अध्यक्ष सचिन होले, कारंजा येथील गोकुल सिटी येथे आयोजित बैठकीला आमदार सुमित वानखेडे, आमदार दादाराव केचे, माजी आ. सुधाकर कोहळे, माजी जिप अध्यक्षा सरिता गाखरे, कारंजा मंडळाचे अध्यक्ष चक्रधर डोंगरे, भाजपचे जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर व पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते. बैठकीत पदवीधर मतदारसंघाशी संबंधित नोंदणी व विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चाकरण्यात आली तसेच आगामी कार्याबाबत ठोस दिशा निश्चित करण्यात आली. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदार नोंदणी व्हावी यासाठी विशेष अभियान राबवण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.बैठकीला मार्गदर्शन करताना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, मागील निवडुकीत आपण गाफील राहिल्याने त्याची किंमत आपल्याला चुकवावी लागली. मात्र यावेळी आपण सावध असणे गरजेचे आहे. पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जास्तीत जास्त पदवीधरांची नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. भाजपच्या काळात आपल्या परिसराचा विकास झपाटयाने होत आहे. विकासाचा हा झंझावता असाच कायम राहण्यासाठी ही निवडणूक आपल्याला जिंकणे निकडीचे आहे. सर्वांना त्यासाठी आतापासून मतदार नोंदणी च्या कामाला लागावे असे ही पालकमंत्री म्हणाले. याप्रसंगी आमदार सुमित वानखेडे,आमदार दादाराव केचे, माजी आमदार सुधाकर कोहळे यांनी मार्गदर्शन केले. बैठकीला पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# विषारी औषध प्राशन केल्याने युवकाचा मृत्यू

वर्धा : मानसिक तणावातून ३५ वर्षीय युवकाने विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची घटना वडनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खेकडी-शेकापूर (बाई) येथे उघडकीस आली आहे, आशिष देवराव गिरडकर (३५) रा. खेकडीअसेमृतकाचेनावआहे,आशिष गिरडकर हे २०२० मध्ये पत्नीपासून विभक्त झाले होते, त्यानंतर ते सतत मानसिक तणावात राहत असल्याची माहिती समोर आली आहे, २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता दरम्यान त्यांनी स्वत : च्या शेतातील नेलेलेविषारीऔषधप्राशनकेले, हीबाब लक्षात येताच कुटुंबियांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, याप्रकरणी वडनेर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# स्वरानंदवन संगीत रजनीने शहरवासियांना केले मंत्रमुग्ध

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

हिंगणघाट,दि.०८

स्थानिक रोटरी क्लबच्या वतीने रोटरी उत्सवाच्या निमित्ताने टाका ग्राउंड येथे आयोजित करण्यात आलेल्या जगप्रसिद्ध 'स्वरानंदवन' संगीत रजनी कार्यक्रमाने हिंगणघाटकरांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. आनंदवनातील दिव्यांग बांधवांनी सादर केलेल्या या कार्यक्रमात देशभक्तीपर गीते, भक्तीगीते, नृत्य, मिमिक्री आदी विविध कलांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. शारीरिक अडचणी असूनही बौद्धिकदृष्ट्या सक्षम असलेल्या या कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून समाजाला सकारात्मकतेचा संदेश दिला व उपस्थितांची मने जिंकली.

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. विकास आमटे यांच्या प्रेरणेतून साकार झालेला व महारोगी सेवा समितीचे विश्वस्त सदाशिव ताजने यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला. . यावेळी डॉ. अशोक मुखी यांनी आनंदवनातील दिव्यांग बांधवांना मदतीचा हात देण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून सर्वांनी या पुण्यकार्याला सहकार्य करावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन शमा पठाण, अशोक डालिया, हितेंद्र जोबनपुत्रा व पराग कोचर यांनी केले. यावेळी शमा पठाण यांनी दिव्यांग बांधवांची जिद्द व सकारात्मकता प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लबच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

## सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स 'जनरेशन लार्ज' च्या मूळ आवाजासह परत आले




**नागपूर, ८ फेब्रुवारी :** सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा बॉलीवूडच्या अजरामर सुरांना आणि हिप-हॉपच्य ऊर्जावान तालांना एकत्र आणणारा, संगीतप्रेमींमध्ये खास ओळख असलेला अनुभवाधारित संगीत महोत्सव पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित सीझन फोरसह परतला आहे. मागील सर्व सीझनना मिळालेल्या प्रचंड यशावर उभारलेला हा नवा सीजन यंदा अधिक भव्य आणि महत्त्वाकांक्षी ठरणार असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कलाकारांची दमदार फळी यात सहभागी होणार आहे. तरुणाईच्या उत्साहाने भरलेल्या व्हिझाग, कोलकाता, मुंबई आणि मोहाली या चार प्रमुख शहरांमध्ये होणारा हा मल्टी-सिटीूर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे.

रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आजच्या तरुण पिढीच्या विविध आवडी-निवडींना एकत्र आणणारा, आगळा-वेगळअनुभव देणारा उपक्रम म्हणून ओळखला जातो. संगीत, फॅशन, खाद्यसंस्कृती आणि गेमिंग अशा तरुणाईच्या आवडत्या क्षेत्रांना जोडणाऱ्या उपसंस्कृतिक घटकांचा सुरेख संगम साधत, हा मंच प्रेक्षकांना वेगळ्या आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनुभव देतो.

रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा भव्य ध्वनी-प्रकाशांडणी, सहभागी चाहत्यांसाठी खास झोन्स आणि रंगतदार सांस्कृतिक सादरीकरणांचा संगम साधणारे, बहुअंगी आणि अनुभवसमृद्ध कार्यक्रम घडवण्यासाठी प्रसिद्ध आहे, प्रत्येक आयोजन करणाऱ्या शहराची खासियत आणि ऊर्जा टिपत, हा मंच प्रेक्षकांना एक अविस्मरणीय अनुभव देतो.

## जावा येझदी मोटरसायकल्सने नागपूरमध्ये नवीन डीलरशिपसह महाराष्ट्रातील उपस्थिती अधिक मजबूत केली

**नागपूर, ८ फेब्रुवारी :** भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या दुचाकी बाजारपेठ असलेल्या महाराष्ट्रात जावा येझदी मोटरसायकल्सने आपली उपस्थिती अधिक बळकट करत नागपूरमध्ये नवीन डीलरशिप सुरू केली आहे. प्रीमियम मोटरसायकलिंगची मागणी वेगाने वाढत असलेल्या राज्यातील प्रमुख उदयोन्मुख बाजारांपैकी नागपूर हे एक महत्त्वाचे शहर आहे. उन्नती ऑटो शहरातील रायडर्सना सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह आफ्टर-सेल्सपोर्ट देण्याच्या कंपनीच्या दृढ वचनपूर्तीला पाठबळ देणार आहे. आयटी हब्स आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमुळे वाढत असलेल्या शहरी लोकसंख्येमुळे नागपूर हे एक महत्त्वाचे आकांक्षी बाजार म्हणून उदयास येत आहे. येथे तरुण व्यावसायिक प्रीमियम मिड-साईजमोटरसायकल्सकडे आकर्षित होत असून, या मोटरसायकल्स शहरातील वाहतूक सहज हाताळण्यासोबतच नवीन नागपूरमुंबई समृद्धी एक्सप्रेसवे सारख्या हायवेवर टूरिंगचा उत्तम अनुभव देतात.

जावा येझदी मोटरसायकल्सचे सहसंस्थापक अनुपम थरेजा म्हणाले, मुंबई आणि पुण्यात प्रति किलोमीटर दुचाकींची घनता इतर भारतीय शहरांच्या तुलनेत जास्त असल्याबद्दल आपण ऐकतो. नागपूरलाही दुचाकींची विशेष आवड आहे आणि येथे नोंदणीत दुचाकींची संख्या चारचाकींपेक्षा जास्त आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि नागपूरमधून टूरिंग व ॲडव्हेंचरचा वाढता कल पाहता, येथील तरुण आणि महत्त्वाकांक्षी रायडर्स आता खऱ्या परफॉर्मन्स क्लासिक मोटरसायकलिंगच्या जगात प्रवेश करण्यास तयार आहेत, असा आमचा विश्वास आहे. आमचा नवीन अधिकृत भागीदार नागपूरमधील उत्साही रायडर्सना सर्वोत्तम मिड-साईजइंजिन्स, रायडर-फर्स्टफीचर्स, आकर्षक डिझाइन आणि भारतातील समृद्ध रायडर परंपरेत रुजलेल्या ब्रँड्ससह स्वागत करण्यात मदत करेल.

लाकडगंज, नागपूर येथे स्थित ही डीलरशिप संपूर्ण ३एस (सेल्स, सर्व्हिस, स्पेअर्स) सुविधेसह सुसज्ज असून ग्राहकांना एक परिपूर्ण मालकी अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. येथे जावा आणि येझदी मोटरसायकल्सची संपूर्ण श्रेणी, अस्सल ॲक्सेसरीज आणि कस्टमायझेशन पर्याय उपलब्ध असतील.

उन्नती ऑटो जावा येझदी मोटरसायकल्सच्या देशव्यापी मजबूत नेटवर्कचा भाग बनली असून, हे नेटवर्क वारसा, परफॉर्मन्स आणि विश्वास यांचा संगम साधणारा सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाचा अनुभव देण्यासाठी उभारण्यात आले आहे. सर्व ३एस सुविधांप्रमाणेच, या डीलरशिपला प्रशिक्षित तंत्रज्ञ, अत्याधुनिक साधने आणि कंपनीचा पहिल्याच श्रेणीतील कस्टमर ॲश्युरन्स प्रोग्रामचा पाठिंबा आहे.नागपूर, ७ फेब्रुवारी : भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या दुचाकी बाजारपेठ असलेल्या महाराष्ट्रात जावा येझदी मोटरसायकल्सने आपली उपस्थिती अधिक बळकट करत नागपूरमध्ये नवीन डीलरशिप सुरू केली आहे. प्रीमियम मोटरसायकलिंगची मागणी वेगाने वाढत असलेल्या राज्यातील प्रमुख उदयोन्मुख बाजारांपैकी नागपूर हे एक महत्त्वाचे शहर आहे. उन्नती ऑटो शहरातील रायडर्सना सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह आफ्टर-सेल्ससपोर्ट देण्याच्या कंपनीच्या दृढ वचनपूर्तीला पाठबळ देणार आहे.

## रम्मू अग्रवाल यांच्या आर संदेश ग्रुपने रिअल इस्टेट क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आरटेक स्टुडिओजसोबत एक मोठा चित्रपट प्रोजेक्ट सुरू केला



**नागपूर, ८ फेब्रुवारी :** मध्य भारतातील अग्रगण्य रिअल इस्टेट आणि मीडिया ग्रुपपैकी एक असलेल्या, दूरदर्शी उद्योजक रामदेव (रम्मू) अग्रवाल आणि दिलीप अग्रवाल यांनी स्थापन केलेल्या, आर संदेश ग्रुपने, प्रीमियम गेटेड कम्युनिटी प्रोजेक्टच्या यशस्वी डिलीव्हरीसह या वर्षाची दमदार सुरुवात केली आहे. या यशावर आधारित, त्यांची मुलगी श्रद्धा अग्रवाल यांनी स्थापन केलेल्या 'आरटेक स्टुडिओज' या ग्रुपच्या सिस्टर कंपनीने, महत्त्वाकांक्षी नवीन चित्रपट प्रोजेक्टची (सध्याच्या अंदाजे शीर्षक डि५५) सुरूवात केली. या निमित्ताने चेन्नईमध्ये एक भव्य पूजा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या शुभ प्रसंगी, संस्थापक रम्मू अग्रवाल यांच्यासोबत मुख्य अभिनेते धनुष, श्रीलीला, साई पल्लवी आणि दिग्दर्शक राजकुमार पेरियासामीही उपस्थित होते, जे विविध उद्योगांतील कंपनीच्या वाढत्या विस्ताराचे प्रतीक आहे. या सोहळ्यानंतर अधिकृतपणे चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. या चित्रपटाची निर्मिती आर टेक स्टुडिओज मीडियाप्रेन्योर अझमत जगमग आणि वंडरबार फिल्म्सचे श्रेयस श्रीनिवासन यांच्या सहकार्याने करत आहेत, तर विश्वनाथन रामास्वामी आणि संदेश अग्रवाल हे सह-निर्माआहेत. सध्या विकासाच्या टप्प्यात असलेल्या अनेक प्रकल्पांसह, आर टेक स्टुडिओज त्यांच्या क्रिएटिव्ह प्रोजेक्ट्सचा सतत विस्तार करत आहे, ज्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रातील आर संदेश ग्रुपचा मजबूत वारसा तसेच मनोरंजन क्षेत्रातील उपस्थिती आणखी मजबूत होत आहे.

# शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू होता 'कॅसिनो'

## पोलिसांनी धाड, ३ आरोपी अटकेत, १७ डिजिटल मशीन जप्त

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८ :**

गोवाच्या धर्तीवर आता नागपुरातही कॅसिनो क्लब सुरू झाले आहेत. आर्थिक आमिष, झटपट श्रीमंतीची स्वप्ने आणि चित्रपटांमध्ये दिसणारी झगमगाटाच्या भ्रमातून तरुणाई या जुगाराकडे आकर्षित होत आहे. टिमकी-पाचपावलीतीलदाट वस्ती आणि बाजाराच्या आडोशात सुरू असलेल्या अशाच एका अड्ड्याचा तहसील पोलिसांनी धाड टाकून भंडाफोड केला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील एका इमारतीत अत्यंत गुप्त पद्धतीने एक, दोन नव्हे तर १७ डिजिटल कॅसिनो यंत्रातून हा जुगार अड्डा चालवला जात होता. विशेष म्हणजे बाहेरून साधी कार्यालयीन जागा भासणाऱ्या या ठिकाणी आतमध्ये मात्र कॅसिनोची पूर्ण मांडणी करण्यात आली होती. या कारवाईत पोलिसांनी १७ डिजिटल कॅसिनो मशीन, रोख रक्कम आणि इतर साहित्य असा लाखोंचा माल जप्त करून ३ आरोपींना जुगार खेळताना रंगेहात अटक केली. गौरव राजेश नान्हे (२३) रा. जुनी मंगळवारी, अक्षय देविदास फुलझेले (२६) रा. नाईक तलाव, बांग्लादेश, रोहित श्रीकांत भोंगाडे (२३) रा. आंबेडकरनगर, वाडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मात्र हा अड्डा चालवणारा मुख्य आरोपी एजाज शेख (३२) रा. जरीपटका हा फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. अटकेतील आरोपींना शनिवारी दुपारी अवकाशकालीन न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी त्यांची पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

टिमकी परिसरात पाचपावली रेल्वे फाटकजवळील विजय मेडिकोजच्या गल्लीत एका इमारतीमध्ये पहिल्या माळ्यावर कॅसिनो क्लब सुरू असल्याची माहिती तहसील पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर शुक्रवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास पोलिसांनी सापळा रचून येथे धाड टाकली. आतले दृष्य पाहून पोलिसही आश्चर्यचकित झाले. अत्यंत गुप्त पद्धतीने एक, दोन नव्हे तर १७ डिजिटल कॅसिनो यंत्रातून हा जुगार अड्डा चालवला जात होता. फ्रंट लाईल, हॅलो विन, मास्टर, एक्स्प्रेस बोनस, क्रेझिव्हिल, टॉपर आणि मिंट या कॅसिनो मशीनमधून आकड्यांची शर्यत लावली जात होती. पोलिसांनी वरील आरोपींना कॅसिनोवर खायवडी करताना रंगेहात अटक केली. त्यांच्याकडून १७ कॅसिनो मशीन, रोख ४ हजार, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, ३ मोबाईल फोन असा एकूण ४ लाख ८३ हजार ८५० रुपयांचा माल जप्त केला. काही निवडक आणि विश्वासू ग्राहकांनाच कॅसिनोमध्ये प्रवेश दिला जात असल्याने हा प्रकार दीर्घकाळ पोलिसांच्या नजरेत न येता सुरू होता.

पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई वपोनि संजय मेंढे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक संजय माने, प्रमोद सोनटक्के, विनोद गवई, राशिद शेख व इतरांनी केली.

# प्रेमसंबंध एकीशी तर लग्न दुसऱ्या तरुणीशी

## प्रियकराविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८ :**

एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून गेल्या तीन वर्षांपासून प्रेमसंबंध ठेवल्यानंतर तरुणाने दुसऱ्या तरुणीशी लग्न उरकुन टाकले. प्रेयसीला माहिती मिळताच तिने पोलिस ठाण्यात बलात्कार केल्याची तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला.

पीडित २७ वर्षीय तरुणी मानकापूर येथील म्हाडा कॉलनीत राहते. तिची गेल्या तीन वर्षांपूर्वी आरोपी युवक फैसल खान अब्दुल लतीफ खान याच्याशी ओळख झाली. तो कळमना येथील रहिवासी असून त्याने तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. आरोपी फैसल हा तिच्या घरी येऊ लागला आणि तिच्यावर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणू लागला. सलग तीन वर्षांपर्यंत शारीरिक संबंध ठेवल्यांतर त्याने लग्नाचे आमिष दाखवले. मात्र, काही दिवसांतच त्याने अन्य मुलीशी लग्न केले. त्यानंतरही त्याने सत्य लपवले आणि भावनिक विश्वासघात करीत तिच्याशी लैंगिक संबंध कायम ठेवले. तिने लग्नाचा तगादा लावला असता त्याने लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला आणि दुसऱ्या महिलेशी लग्न केल्याचे सांगितले. फसवणूक झाल्याची माहिती मिळताच तिने मानकापूर पोलिस पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी फैसल वर गुन्हा दाखल केला.

## चिमुकलीचे अपहरण करणारा पोलिसांच्या जाळ्यात

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८ :**

एका दोन वर्षीय चिमुकलीचे अपहरण करणाऱ्या एका आरोपीला कळमेश्वर पोलिसांनी आपल्या जाळ्यात ओढून मुलीची सुखरूप सुटका केली. मुकेशकुमार प्यारेसिंग धुर्वे (२७) असे या अपहरणकर्त्याचे नाव आहे. मुकेशकुमार हा मुळचा मध्य प्रदेशातील राहणारा आहे. कामधंद्यासाठी तो कळमेश्वरला आला होता. अपहृत मुलीच्या घराशेजारीच तो रहात होता. त्यामुळे मुलीच्या कुटुंबियांशी त्याची ओळख होती. ऐकमेकांच्या घरी त्यांची येजा होती. ६ फेब्रुवारी रात्री ८ च्या सुमारास मुलीला फिरवून आणतो असे बोलून मुलीला घेऊन गेला. बराच वेळ झाला, तरी मुलगी न आल्याने तिच्या आईवडिलांनी शोध सुरू केला. परंतु, कुठेही मुलगी मिळून आली नाही. शेवटी कळमेश्वर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांची पथके तयार केली. नागपूर जिल्ह्याच्या लगत असलेल्या अमरावती, वर्धा, चंद्रपूर, भंडारा आणि मध्य प्रदेशातील सिवनी, पांढुर्णा, छिंदवाडा येथेही स्थानिक पोलिसांच्या मदतीने फिल्डींग लावण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेने नागपूर रेल्वेस्थानक आणि बसस्थानकाचा ताबा घेतला. पोलिसांनी कळमेश्वर परिसरातील सीसी फुटेज तपासले असता आरोपी हा मुलीला घेऊन बसस्थानकाकडे जाताना दिसला. घटनास्थळापासून ७ किमी अंतरावर असलेल्या एका बसमध्ये लपून बसलेल्या अवस्थेत मुलगी मिळून आली. आरोपीचा शोध घेतला असता तो देखील त्याच परिसरात मिळून आला. पोलिसांनी मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता काही गैरप्रकार झाला नसल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. कळमेश्वर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### जुगाऱ्यांना अटक

बुटीबोरी एमआयडीसी परिसरातील सातगाव, तुरकमारी येथे मोकळ्या जागेत जुगार खेळणाऱ्या सहा जणांना जुगार खेळताना बुटीबोरी पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून तासपत्ते आणि १८६० रुपये जप्त केले.

# गण गण गणात बोते ने दुमदुमली वाडीनगरी





**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**वाडी, दि. ८ :**

येथील माऊली नगर मध्ये स्व. श्री. कृष्णराव चरडे (गुरुजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्रीकृष्ण फाऊंडेशन व संयोजिका आशा चरडे यांच्या सहकार्याने श्री राम कथा सप्ताह व गजानन महाराज प्रकट दिन सोहळा निमीत्य वाडी परिसरातुन गण गण गणात बोते या मधुर स्वरात दिंडी काढण्यात आली. सर्वप्रथम नगराध्यक्ष नरेश चरडे , नगरसेवक संदीप चरडे, नगरसेविका कांचन उईके दामोदर जोध, योगेश चरडे, विशालजोध,वासुदेव कोरे, मोहतकर सर, अनिल कोरडे, गणेश इंगळे, उत्तम बोबडे, श्रावण काकडे यांच्या उपस्थितीत दिंडीला सुरवात केली. दिंडीत श्री भिक्कमपुरी महाराज,हरिपाठ मंडळ,टामगांवच्या वारकरी मंडळीनी मृदंग , टाळ चिपळ्याच्या तारा सुरात भजने सादर केली.दुपारी रामायणाचार्य व शिवचरित्रकार ह.भ.प. किशोर महाराज ठाकरे (आळंदीकर) यांच्या सुश्राव्य वाणीद्वारे दुपारी काल्याचे किर्तन पार पडले. संध्याकाळी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

आयोजनासाठी श्रीकृष्ण फाऊंडेशनचे राजेश गिरी, विक्की पाठक, मदन गोहते, राहूल ठाकरे आदींनी सहकार्य केले.

## पल्सरच्या विचित्र अपघातात युवक ठार, दोन जखमी

**नागपूर, दि. ८ :** एका भरधाव पल्सरचालकाने एका ॲक्टीवा आणि अन्य दुचाकीला जबर धडक दिली. त्यानंतर तो युवक एका कारखाली चिरडल्या गेल्याने जागीच ठार झाला. तर पल्सरवर मागे बसलेला युवक आणि अ?क्टीवाचालक गंभीर जखमी झाले. हा अपघात शनिवारी रात्री साडेदहा वाजता प्रतापनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पडोळे चौकाजवळील राधे मंगलम कार्यालयाजवळ झाला. अपघातात ठार झालेल्या युवकाचे नाव अद्याप कळू शकले नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास एक पल्सरचालक पाठीमागे मित्राला बसवून भरधाव जात होता. पडोळे हॉस्पिटल चौकातून जात असताना पल्सरने एका ॲक्टीव्हाला धडक दिली.

## वाहनचोर गजाआड

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८**

वाडी पोलिसांनी दोन वाहनचोरांना अटक करून त्यांच्या ताब्यातून चोरीच्या पाच दुचाकी जप्त केल्या.

२४ जानेवारी रोजी अतुल सिद्धार्थ खोब्रागडे (३४) यांच्या मालकीची मोटरसायलक घेऊन त्यांचा भाऊ कार्यालयात गेला होता. २५ जानेवारीला अतुल यांच्या भावाने दुचाकी अतुल रहात असलेल्या इमारतीच्या खाली पार्किंगमध्ये उभी करून तो झोपी गेला होता. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरांनी दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी वाडी पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. पोलिस तपास करीत असतानाच खबऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी परसराम सुभाष सूर्यवंशी (१९) आणि भरत रामदयाल भारद्वाज यांना ताब्यात घेतले. दोघांनीही चोरीची कबुली दिली. त्यांनी शहरातील विविध परिसरातून पाच दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीच्या दुचाकी जप्त केल्या.

## बारसेनगरात घरफोडी

**नागपूर, दि. ८ :** बारसेनगर येथील भीमज्योती विहारामागे राहणाऱ्या रोहण राजेंद्र वाघमारे (२९) यांचे घर फोडून अज्ञात चोरांनी सव्वातीन लाखांचा ऐवज चोरून नेला. ६ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास रोहण यांनी तळमजल्यावरील दार कुलूपबंद करून झोपायला वरच्या मजल्यावर गेले होते. रात्रीच्या वेळी केव्हातरी अज्ञात चोरांनी तळमजल्यावरील मागील दार तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने व रोख ६० हजार रुपये असा सव्वातीन लाखांचा ऐवज चोरून नेला.

# जुन्या उच्च न्यायालयात बहुमजली पार्किंगचा पर्याय

## जिल्हा न्यायालयातील अडचण दूर होणार; पीडब्ल्यूडीकडे उत्तर मागितले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ८ :**

जिल्हा न्यायालय परिसरातील पार्किंगच्या अव्यवस्थेचा परिणाम न्यायालयाच्या कामकाजावरही होत असून ही समस्या सोडविण्यासाठी न्यायालय परिसरातील नाला तसेच शेजारील जुन्या उच्च न्यायालय परिसरात बहुमजली इमारत उभारता येईल का, याबाबतचे उत्तर उच्च न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागितले आहे.



ही प्रस्तावित इमारत जिल्हा न्यायालयातील पार्किंगची समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरणार असून, न्यायालयाच्या शेजारी असलेल्या नाल्यावरून तसेच रस्त्याच्या वरून हे बांधकाम करण्याचा उच्च न्यायालयाचा मानस आहे. जिल्हा वकील संघटनेचे माजी सचिव अ?ड. मनोज साबळे यांनी जनहित याचिका दाखल करून हा मुद्दा उच्च न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिला. या याचिकेवर न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. दरम्यान, अ?ड. सेजल लाखानी यांनी न्यायालय परिसरातील पार्किंग समस्येसह रुग्णवाहिका व अग्निशमन वाहनांच्या हालचालींना होणाऱ्या अडथळ्यांबाबत विविध मुद्दे उपस्थित केले.

### सविस्तर आराखडा तयार करा

न्यायालयाने प्रशस्त बहुमजली इमारत उभारता येईल का, याची शक्यता तपासण्याचे निर्देश देत त्यासंदर्भातील सविस्तर आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करावा, असे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, या आराखड्यात प्रशासकीय इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून उंच वाहनांना कोणतीही अडचण होणार नाही, याची पूर्वतयारी करून नियोजन करण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# आठवडी बाजारामुळे वाहतुकीची कोंडी

## भाजी विक्रेते रस्त्यावर



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**कळमेश्वर, दि. ८ :**

कळमेश्वर शहरांमध्ये रविवारी भरणारा आठवडी बाजार हा कळमेश्वर सावनेर बायपास मार्गावर भरत असून. दुपदरी असलेल्या या मार्गावर एका बाजूला भाजी विक्रेत्याची दुकाने दुसऱ्या बाजूला भाजी विक्रेते. आपली चार चाकी वाहने. उभी करतात. त्यामुळे वाहतुकीचा अडथळा निर्माण होतो. नगरपरिषदेच्या दुर्लक्षित पणामुळे. भाजीविक्रेत्यांचा मनमानी कारभार सुरू आहे . कळमेश्वर शहरांमध्ये दर रविवारी आठवडी बाजार भरत असतो. नगरपरिषदेने भाजीपाला विक्रेत्यांना शेड बांधून दिले आहेत . परिसरात. मोकळी जागा सुद्धा उपलब्ध करून दिली आहे. परंतु. भाजीपाला विक्रेते मटन मार्केट समोरील. कळमेश्वर सावनेर दुपदरी बायपास रोडवर दुकाने लावत असल्यामुळे. वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. भाजीपाला विक्रेते एवढ्यावरच थांबत नाही तर. या मार्गावर एका बाजूला भाजी विक्री त्याची दुकाने. दुसऱ्या बाजूला भाजी विक्रेते आपली चार चाकी वाहने उभी करतात. तसेच भाजी खरेदी करता येणारे ग्राहक सुद्धा आपली दुचाकी वाहने रस्त्यावरच उभी ठेवत असल्यामुळे. मटन मार्केट चौक ते कळमेश्वर नगरपरिषद अग्निशमन केंद्र. पुढे अहिल्याबाई होळकर चौकापर्यंत दुचाकी चार चाकी वाहने उभी राहत असल्यामुळे. हा रस्ता वाहनासाठी पार्किंग स्थळ बनला आहे. त्यामुळे या मार्गावरील. वाहतूक ठप्प होते. नाईला जास्त नागपूर कडून येणाऱ्या वाहन चालकांना सावनेर ला जाण्याकरता. कळमेश्वर बस स्थानक ब्राह्मणी फाटा मार्गे सावनेरला जावे लागते. या मार्गावरील अवजड वाहने कळमेश्वर ब्राह्मणी शहरांमधून जात असल्यामुळे. अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण होते. नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे. भाजीपाला विक्रेत्यांचा मनमानी. कारभार सुरू आहे. कळमेश्वर मटन मार्केट.ते अहिल्याबाई होळकर. चौकापर्यंत ते पुढे अर्धा किलोमीटर परिसरात शहरातील भाजीपाला विक्रेते तसेच तालुक्यातील शेतकरी सुद्धा शेतातील भाजीपाला विक्रीची दुकाने लावत असतात सहा महिने आधी. कळमेश्वर नगर परिषद. व पोलीस प्रशासनाने. भाजी विक्रेतांना तंबी देऊन रस्त्यावरील वाहने. हटवून रस्ता मोकळा करण्यास सांगितले होते परंतु कालांतराने परिस्थिती जैसे थे झालीच तसेच कॅनरा बँकेसमोरही दुपदरी मार्गावर दोन्ही बाजूला. कापड विक्रेते माठ. विक्रेते व स्टेशनरी साहित्य. विकणारे दुकानदार दुकाने लावून. वाहतुकीस अडथळा निर्माण करतात. नागपूर रोडवर स्मशानभूमी असून. रविवारी कळमेश्वर ब्राह्मणी शहरातील कोणी मरण पावल्यास या रोडवरील दुकानदाराच्या अतिक्रमणामुळे. स्मशानभूमीत अंतिम यात्रा कशी न्यावी. हा प्रश्न. निर्माण होतो. दर रविवारी अस्तव्यस्त भरणाऱ्या आठवडी बाजारामध्ये. फळ विक्री करणारे. व अन्य वस्तू विक्री करणारे हातगाडी दुकानदार सुद्धा. मटन मार्केट समोर रस्त्यावर तसेच. भाजी बाजारात. रस्त्याच्या मधोमध दुकाने लावत असल्यामुळे. वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन. येथे नेहमी वाद विवाद होत असतात. तसेच भाजीपाला खरेदी करता येणाऱ्या ग्राहकांना सुद्धा. प्रचंड त्रास सहन करावा लागतो. गेल्या कित्येक दिवसापासून. भाजीपाला. फळे विक्रेते व अन्य वस्तू विक्री करणारे दुकानदाराचा मनमानी कारभार सुरू असून.

कळमेश्वर ब्राह्मणी नगरपरिषद प्रशासन. व पोलीस प्रशासनाने. संयुक्त मोहीम राबवून. दुकानदारांना शिस्त लावून. या दुपदरी. मार्गावर वाहनासाठी एकेरी वाहतूक सुरू ठेवावी. व भाजीपाला विक्रेत्यांच्या मनमानी कारभारावर आळा घालावा. अशी मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे.

# आंबेडकरनगरात बिरसा मुंडा यांचा पुतळा उभारा

## नगराध्यक्ष यांना आदिवासी महिला मंडळाचे निवेदन



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**वाडी, दि. ८ :** नगर परिषद वाडी अंतर्गत आंबेडकर नगर येथे महामानव भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा उभारा अशा आशयाचे निवेदन नगराध्यक्ष नरेश चरडे यांना राणी दुर्गावती आदिवासी महिला मंडळातर्फे देण्यात आले. आंबेडकर नगर येथील देवेंद्र बोरीकर यांच्या घरासमोरील खाली जागेत भगवान बिरसा मुंडा यांचा पुतळा उभारा असे निवेदनातुन स्पष्ट केले. या विषयीचे १८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांना निवेदन दिले होते. परंतु आचारसहींता लागल्यामुळे हा विषय मागे पडला. आता हा विषय समोर न्यावा असेही निवेदनातुन स्पष्ट केले. यावेळी अध्यक्ष ज्योती मरकाम, उपाध्यक्ष उषा कुंभरे,दिनेश उईके, जगदिश मरकाम, सचिन सलामे, नरेश मसराम, भलावी , विनोद करनाके, शारदा मरसकोल्हे,रेखा कोडापे, यशोदा मडावी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१